बुधवार, २० एप्रिल २०२२

# राम प्रहर

◆ वर्ष १४ ◆ अंक २७२
www.ramprahar.com

◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

अंतरंग

कर्जतमध्ये अल्पवयीन विद्यार्थिनीवर बलात्कार/२
अलिबागच्या पांढऱ्या कांद्याची यंदा निर्यात नाही!/५
राजस्थानचा कोलकातावर रोमहर्षक विजय/८

## शिवसेना-राष्ट्रवादीतील संघर्ष पुन्हा चव्हाट्यावर

**औरंगाबाद** : महाविकास आघाडी सरकारच्या माध्यमातून राज्यात एकत्र असलेल्या शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यातील संघर्ष पुन्हा एकदा समोर आला आहे. शिवसेनेचे दोन मंत्री राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांना धमकावतात, असा गंभीर आरोप राज्याचे आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी केला आहे. पक्षाच्या मेळाव्यात त्यांनी हे वक्तव्य केले. विशेष म्हणजे या वेळी राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे व्यासपीठावर उपस्थित होत्या. राजेश टोपेंचा रोख हा रोहयो मंत्री संदीपान भामरे आणि राज्यमंत्री अब्दुल सत्तार यांच्याकडे होता. दरम्यान, आरोग्यमंत्री टोपे यांच्या आरोपाला शिवसेनेच्या मंत्र्यांनी उत्तर दिले आहे. टोपे यांचे आरोप खोटे असल्याचे भुमरे म्हणाले, तर राष्ट्रवादी हा पक्ष प्रायव्हेट कॅरियर झाला असून त्यांना फोडण्याची गरज काय, असे सत्तार म्हणाले.

# भ्रष्टाचाराविरोधात भाजपचा एल्गार

## ■ मुंबईत पोलखोल अभियान रथयात्रा

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई महापालिकेतील भ्रष्ट कारभाराची पोलखोल करण्यासाठी भाजपच्या वतीने पोलखोल अभियान रथयात्रा सुरू करण्यात आली आहे. चेंबूर कॅम्प येथील भाजप कार्यालयात विधान परिषद विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर यांच्या हस्ते व आमदार प्रसाद लाड यांच्या प्रमुख उपस्थितीत मंगळवारी (दि. १९) याची सुरुवात झाली.

मुंबई भाजपच्या पुढाकाराने सुरू करण्यात आलेल्या पोलखोल अभियानाचा रथ मुंबईतील वाड्यावस्त्यांवर तसेच प्रत्येक गल्लीत जाऊन मुंबई महापालिकेच्या कामकाजात झालेला भ्रष्टाचार व्हिडीओ स्वरूपात दाखवणार आहे.


दरम्यान, पोलखोल अभियानाच्या पार्श्वभूमीवर रात्री अज्ञातांकडून रथाचे (वाहनाचे) नुकसान केल्याचे दिसून आले. ही तोडफोड महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी केल्याचा आरोप भाजपने केला असून तोडफोड करणाऱ्यांवर तातडीने कारवाईची मागणी विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर आणि आमदार प्रसाद लाड



यांनी पोलीस ठाण्यात रितसर तक्रार देऊन केली तसेच आरोपींना तातडीने अटक न केल्यास ठिय्या आंदोलनाचा इशाराही दिला आहे.

या वेळी आमदार प्रसाद लाड म्हणाले की, मुंबई महापालिकेत झालेल्या भ्रष्टाचाराची पोलखोल करणाऱ्या भाजपच्या अभियान रथावर रात्रीच्या काळोखात भ्याड हल्ला करण्यात आला. महाविकास आघाडीकडे द्यायला उत्तर नसल्यानेच भाजपच्या अभियानावर असे भ्याड हल्ले केले जात आहेत.

### काहीही केले तरी यात्रा थांबणार नाही -फडणवीस



**पुणे** : भाजपने मुंबई महापालिकेतील भ्रष्टाचाराविरोधात पोलखोल अभियान रथयात्रा सुरू केली आहे, मात्र त्याआधीच या पोलखोल यात्रेसाठी वापरण्यात येणाऱ्या रथाची काही अज्ञातांनी तोडफोड केल्याचे समोर आले. या पार्श्वभूमीवर विधानसभा विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी हल्लाबोल केला आहे.

पुण्यात प्रसारमाध्यमांशी बोलताना विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आमच्या पोलखोल यात्रेच्या बसवर दगडफेक होणे अपेक्षितच आहे. ज्या प्रकारे यांचा बुरखा फाटतो आहे, यांच्या भ्रष्टाचाराची पोलखोल होतेय. त्यातूनच ते असा प्रयत्न करीत आहेत, पण त्यांनी काहीही केले तरी यात्रा थांबणार नाही. आम्ही यांच्या भ्रष्टाचाराची पोलखोल करू. या वेळी भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटीलही उपस्थित होते.

# पनवेल मनपा अग्निशमन दल होणार अत्याधुनिक

## महासभेत निर्णय; तळोजा दफनभूमीही होणार विकसित




(छाया : लक्ष्मण ठाकूर)

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महापालिकेच्या अग्निशमन विभागासाठी अत्याधुनिक वाहने खरेदी करण्यास मंगळवारी (दि. १९) झालेल्या महासभेत मंजुरी देण्यात आली. त्यामुळे अग्निशमन दल आता अत्याधुनिक होणार आहे. त्याचप्रमाणे तळोजा सेक्टर १५मधील मुस्लिम दफनभूमी विकसित करण्यास मान्यता मिळाली आहे. कोरोनामुळे मृत्यू झालेल्या महापालिकेच्या तीन कर्मचाऱ्यांच्या वारसांना प्रत्येकी ५० लाख रुपयांचे धनादेश या वेळी देण्यात आले.

पनवेल महापालिकेची सर्वसाधारण सभा मंगळवारी आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात महापौर डॉ. कविता चौतमोल यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या वेळी उपमहापौर सीताताई पाटील, सभागृह नेते परेश ठाकूर, स्थायी समिती सभापती नरेश ठाकूर, महिला व बालकल्याण सभापती हर्षदा उपाध्याय, आयुक्त गणेश देशमुख, अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर उपस्थित होते.

पनवेल महापालिका अग्निशमन विभागासाठी १५ कोटी ८५ लाख रुपयांची नवीन अग्निशमन वाहने खरेदी करण्यास महासभेत मंजुरी देण्यात आली. यामध्ये ॲडव्हान्स फायर इंजिन, रॅपिड इंटरवेन्शन व्हेइकल, मल्टिपर्पज टर्न टेबल लॅडर, वॉटर बाउजर १८ कोलो लिटर व ॲडव्हान्स रेस्क्यू टेंडरचा समावेश आहे. या विषयावर चर्चा करताना अग्निशामक दलातील जवानांना आग प्रतिरोधक गणवेश व हॅण्ड ग्लोव्हज पुरवण्याची मागणी सदस्यांनी केली.

नितीन पाटील यांनी कळंबोली सर्कलजवळ तयार होत असलेल्या नवीन पुलाजवळ अग्निशमन केंद्र उभारण्याची उपसूचना केली. सिडकोच्या अग्निशामक दलाकडे आहेत तशा बाईक घेण्याचीही सूचना करण्यात आली. या वेळी आयुक्तांनी तीन लाख लोकसंख्येला सहा गाड्या व नंतरच्या पुढील एका लाख लोकसंख्येला एक गाडी असे प्लॅनिंग असल्याचे सांगून सिडकोने पनवेल, कामोठे, कळंबोली, रोहिंजण, धानसर, एमआयडीसीसह २९ गावांच्या प्रत्येक शहराला अग्निशामक केंद्र प्रस्तावित केली असल्याची माहिती दिली. उपसूचनेसह या विषयाला मंजुरी देण्यात आली.

पनवेल महापालिका हद्दीतील प्रभाग समिती 'अ'मधील तळोजा सेक्टर १५ येथील भूखंड क्रमांक ८ व ९मध्ये मुस्लिम समाजासाठी दफनभूमी विकसित करण्यात येणार आहे. **(पान २ वर..)**

### मयत कोरोना योद्ध्यांच्या वारसांना धनादेश सुपूर्द

कोरोना काळात पनवेल महापालिकेचे सफाई कामगार लक्ष्मी गायकवाड व गणपत पाटील तसेच लिपिक राजेश बागडे यांचे निधन झाले. या कोरोना योद्ध्यांना शासनाकडून सानुग्रह अनुदान म्हणून मिळालेले ५० लाख रुपयांचे धनादेश त्यांच्या वारसांना या सभेत देण्यात आले.



### भूमिपूजन

**उरण : जेएनपीएमध्ये भारत मुंबई कंटेनरच्या चौथ्या टर्मिनल्सचे काम चालू आहे. या टर्मिनल्सच्या दुसऱ्या फेझचे काम सुरू झाले असून त्याचे भूमिपूजन जेएनपीएचे डेप्युटी चेअरमन उमेश वाघ यांच्या हस्ते सोमवारी करण्यात आले. या भूमिपूजन समारंभास माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर, चीफ इंजिनियर वैजनाथन्, बीएसएतर्फे श्री. गोगो, एमआयसीएल कंपनीतर्फे पराग शहा, श्री. अग्रवाल, उद्योजक जे. एम. म्हात्रे, पी. पी. खारपाटील, टीआयपीएल कंपनीचे धनंजय करतुरी तसेच चंद्रकांत घरत व अन्य मान्यवर उपस्थित होते.**

### निवडक

**अफगाणिस्तानमध्ये बॉम्बस्फोट; २० विद्यार्थ्यांचा दुर्दैवी मृत्यू**

**काबूल** : अफगाणिस्तानची राजधानी काबूलमधील एका माध्यमिक शाळेत मंगळवारी (दि. १९) तीन आत्मघातकी बॉम्बस्फोट झाले असून यामध्ये २०हून अधिक विद्यार्थ्यांचा मृत्यू, तर अनेक विद्यार्थी गंभीर जखमी झाले आहेत. त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मृतांची संख्या वाढण्याची शक्यता आहे.

**अक्षय्य तृतीयेला मनसे करणार मंदिरांत महाआरती**

**मुंबई** : महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मशिदींवरील भोंग्यासंदर्भात दिलेल्या अल्टिमेटमनंतर ५ जून रोजी अयोध्येला जाणार असल्याची घोषणा केली. आता मनसेकडून अक्षय्य तृतीयेला ३ मे रोजी राज्यभरातील मंदिरांमध्ये लाऊडस्पीकर वापरून महाआरती केली जाणार आहे. मनसे नेते नितीन सरदेसाई यांनी ही माहिती दिली.

## पनवेल महापालिका क्षेत्रात मान्सूनपूर्व कामांना प्रारंभ

### सभागृह नेते परेश ठाकूर यांनी केली पाहणी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका क्षेत्रात मान्सूनपूर्व कामांना सुरुवात झाली आहे. त्या पार्श्वभूमीवर सभागृह नेते परेश ठाकूर यांनी महापालिका हद्दीतील तळोजा मजकुर येथे भेट देऊन नाले आणि रस्त्यांच्या कामांची पाहणी केली तसेच अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना केल्या. पावसाळ्याच्या अगोदर ही कामे पूर्ण होतील, असा विश्वास त्यांनी या वेळी व्यक्त केला.

पनवेल महापालिका हद्दीतील तळोजे मजकुर येथे असलेल्या नाल्याला पावसाळ्यात मोठा प्रवाह असतो. त्यामुळे या नाल्याचे काम न झाल्यास नागरिकांना याचा नाहक त्रास सहन करावा लागू शकतो. त्या पार्श्वभूमीवर सभागृह नेते परेश ठाकूर यांनी या नाल्याची तसेच रस्त्यांच्या कामाची अधिकाऱ्यांसह पाहणी केली व त्यांना सूचना दिल्या.

या वेळी नगरसेवक हरेश केणी, भाजप नेते निर्दोश केणी, दिनेश केणी, महापालिकेचे कार्यकारी अभियंता संजय कटेकर यांच्यासह पदाधिकारी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

## पोलादपूरमध्ये आईच्या कुशीतून बाळ पळविले

### ■ अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर एसटी बसस्थानकात झोपलेल्या महिलेच्या कुशीतून तिच्या बाळाला अज्ञात व्यक्तीने पळवून नेल्याची घटना घडली आहे. त्यामुळे खळबळ उडाली असून पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे.

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गालगत असलेल्या पोलादपूर एसटी बसस्थानकात सडवली आदिवासीवाडीतील सुमन वसंत कोळी (वय ३०) ही भंगार गोळा करून उदरनिर्वाह करणारी महिला युवराज वसंत कोळी (आठ महिने) या तिच्या बाळासह रविवारी (दि. १७) झोपली होती. अज्ञात व्यक्तीने तिचे बाळ घेऊन पळ काढला.

या घटनेबाबत सुमन कोळी हिने पोलादपूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार बाळाचे अपहरण केल्याप्रकरणी पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या घटनेचा अधिक तपास सुरू आहे.

### रोह्यातील आरोपी आत्महत्या प्रकरण

## दोन पोलीस कर्मचारी निलंबित, प्रभारी अधिकाऱ्याची बदली

**अलिबाग : प्रतिनिधी**

रोहा पोलीस ठाण्यातील कोठडीत आरोपीने आत्महत्या केल्याचे प्रकरण स्थानिक पोलिसांना भोवले आहे. या प्रकरणी रोहा पोलीस ठाण्यातील दोन कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई, तर प्रभारी अधिकारी संजय पाटील यांची बदली करण्यात आली आहे.

रोहा तालुक्यातील शेणवई येथील रवींद्र वाघमारे याच्यावर पत्नीच्या खुनाचा आरोप आहे. या प्रकरणी त्याला रोहा पोलिसांनी अटक होती. त्याला न्यायालयाने चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली होती. पोलीस कोठडीत असतानाच आरोपीने पहाटेच्या सुमारास चादरीने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना उघडकीस आल्यानंतर रायगड पोलीस दलात खळबळ उडाली. जिल्हा पोलीस अधीक्षक अशोक दुधे यांनी तातडीने रोहा पोलीस ठाण्याला भेट दिली आणि सर्व घटनेची माहिती करून घेतली.

पोलीस अधीक्षक दुधे यांनी या प्रकरणाची चौकशी करून अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या होत्या.

दरम्यान, या घटनेनंतर आदिवासी संघटना आक्रमक झाल्या. त्यांनी या प्रकरणाच्या सीआयडी चौकशीची मागणी केली होती. आता अहवाल आल्यानंतर पोलिसांवर कारवाई करण्यात आली आहे.

# रायगडातील गणेश मंदिरे भाविकांनी फुलली!

## 'अंगारक'निमित्त महड, पालीमध्ये दर्शनासाठी रांगा





**खोपोली, पाली : प्रतिनिधी**

अंगारक संकष्ट चतुर्थीचा योग साधून भाविकांनी मंगळवारी (दि. १९) अष्टविनायकांपैकी तीर्थक्षेत्र असलेल्या रायगडातील महड आणि पाली येथे गणरायाचे दर्शन घेतले. जिल्ह्यातील इतर गणेश मंदिरेही यानिमित्ताने भाविकांनी फुलून गेल्याचे दिसून आले.

कोरोनाचा प्रादुर्भाव ओसरल्यानंतर जनजीवन पूर्वपदावर आले असून शासनाने निर्बंध शिथिल केल्यामुळे धार्मिक स्थळे व मंदिरेही दर्शनासाठी खुली झालेली आहेत. त्यामुळे अष्टविनायकांपैकी तीर्थक्षेत्र असलेल्या महडमध्ये वरदविनायकाचे आणि पालीत बल्लाळेश्वराचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी गर्दी केली होती. या वर्षातील पहिली अंगारक संकष्ट चतुर्थी असल्याने गणेशभक्तांच्या मंदिरांत पहाटेपासून रांगा लागल्या होत्या. त्यामुळे कोरोना काळात व्यवसायाला खीळ बसलेल्या दुकानदार, विक्रेते यांनाही दिलासा मिळाला.

दोन्ही ठिकाणी देवस्थान ट्रस्टच्या वतीने निवास, पाणी व अन्य व्यवस्था करण्यात आली होती, तर मंदिर परिसरात पोलिसांचा बंदोबस्त होता.

### कुपोषणमुक्तीसाठी भाजपचा पुढाकार

## महिला मोर्चातर्फे नवीन पनवेलमध्ये अंगणवाडीतील विद्यार्थ्यांना खाऊवाटप



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि बालकल्याण विभागामार्फत देशभरात कुपोषित बालकांची संख्या कमी होण्यासाठी विविध योजनांच्या माध्यमातून प्रयत्न केले जात आहेत. त्यातील एक भाग म्हणून मंगळवारी (दि. १९) भारतीय जनता पक्ष महिला मोर्चा पनवेलच्या वतीने नवीन पनवेल येथील अंगणवाडी क्रमांक १०मधील विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. पं. स. सदस्य तथा महिला मोर्चा तालुका अध्यक्ष रत्नप्रभा घरत यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम झाला.

संपूर्ण देशभरात कुपोषित बालकांसाठी अंगणवाडीत एकाच वेळी पोषणमूल्य आहार देण्याचा कार्यक्रम यशस्वी करण्याचे ठरवण्यात आले होते. या संदर्भात भाजप महिला मोर्चा महाराष्ट्र प्रदेशच्या बैठकीत प्रदेशाध्यक्ष उमा खापरे यांच्या मार्गदर्शनाखाली बैठक झाली. यामध्ये त्यांनी लहान मुलांना पोषणमूल्य असलेल्या आहाराचे वाटप करायचे आहे असे सांगून केळी, इतर फळे, चिक्की, ड्रायफ्रूट्स, राजगिरा व इतर पौष्टिक लाडू, उकडलेली अंडी असे पोषणमूल्य असलेला आहार वाटप करण्याच्या सूचना केल्या होत्या. त्या अंतर्गत नवीन पनवेल येथील अंगणवाडी क्रमांक १०मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना महिला मोर्चा तालुका अध्यक्ष रत्नप्रभा घरत यांच्या हस्ते पोषण आहाराचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमास महिला मोर्चा पनवेल शहर अध्यक्ष वर्षा नाईक, सुहासिनी केकाणे, अंजली इनामदार, मनीषा चिले, बालवाडी शिक्षिका रेश्मा शेरखाने, पवार यांच्यासह महिला उपस्थित होत्या.

# कर्जतमध्ये अल्पवयीन विद्यार्थिनीवर बलात्कार

## १० आरोपींना सात दिवसांची पोलीस कोठडी

**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील गौरकामत गावातील एका अल्पवयीन शालेय विद्यार्थिनीवर बलात्कार झाल्याची घटना सोमवारी (दि. १८) समोर आली. काही तरुणांनी इन्स्टाग्रामवर ओळख झाल्यानंतर या शाळकरी मुलीची फसवणूक करून बलात्कार केला असून या प्रकरणी कर्जत पोलिसांनी २० ते ३० वयोगटातील १० तरुणांना ताब्यात घेतले.

या प्रकरणी पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल झालेल्या सर्व आरोपींना जिल्हा सत्र न्यायालयाने सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

गौरकामत गावातील १३ वर्षीय शाळकरी मुलीचे इन्स्टाग्रामवर अकाउंट होते. या अकाउंटद्वारे या मुलीची त्याच गावातील काही तरुणांशी ओळख झाली. मार्च २०२१ ते डिसेंबर २०२१ या कालावधीत या मुलीसोबत त्या तरुणांनी मैत्री करून ओळख वाढवली आणि तिच्याकडे विविध प्रकारच्या मागण्या करू लागले



तसेच तिचे अश्लील फोटो इन्टाग्राम अकाउंटवर शेअर करू लागले. त्यामुळे आजूबाजूच्या परिसरातील अनेक तरुणांचे तिला अश्लील संदेश येत असल्याचे त्या मुलीने पोलिसांना दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे.

याबाबत पीडित शाळकरी मुलीने विरोध केला असता तिला जीवे ठार मारण्याची धमकी देत तिच्यावर वारंवार बलात्कार केल्याचे तक्रारीत त्या मुलीने सांगितले.

या सर्व प्रकारामुळे त्या मुलीबद्दल गावात बदनामी सुरू झाल्याने अखेर सोमवारी (दि. १८) कर्जत पोलीस ठाणे गाठून तिने आपल्यावर अनेकांनी बलात्कार केल्याची तक्रार कर्जत पोलीस ठाण्यात पालकांसह जाऊन केली. याबाबत तत्काळ पोलिसांकडून कारवाई करण्यात आली आणि त्या शालेय मुलीच्या तक्रारीनुसार १० तरुणांना रात्रीच ताब्यात घेतले. गौरकामत गावातील आठ आणि शिरसे तसेच जांभिवली गावातील प्रत्येकी एक अशा १० तरुणांवर पोलिसांनी बलात्कार आणि अल्पवयीन मुलीची फसवणूक केल्याप्रकरणी पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

या गुन्ह्यातील सर्व १० आरोपींना कर्जत पोलिसांनी मंगळवारी (दि. १९) पनवेल येथील जिल्हा सत्र न्यायालयात हजर केले असता त्यांना सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन जिल्हा अतिरिक्त पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांनी कर्जतमध्ये येऊन उपअधीक्षक विजय लगारे, या गुन्ह्याच्या तपास अधिकारी निरीक्षक सुवर्णा पत्की यांना सूचना केल्या. या प्रकरणी अधिक तपास सुरू आहे.

## पनवेल महापालिका उपायुक्तपदी कल्पिता पिंपळे



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ठाण्याच्या सहाय्यक आयुक्त कल्पिता किशोर पिंपळे यांची पनवेल महापालिकेच्या उपायुक्तपदी नियुक्ती झाली असून, मंगळवारी (दि. १९) आयुक्त गणेश देशमुख यांनी त्यांचे महापालिकेत स्वागत केले. या वेळी अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रसाळ, उपायुक्त विठ्ठल डाके, उपायुक्त सचिन पवार आदी उपस्थित होते.

कल्पिता किशोर पिंपळे यांनी सर्वप्रथम २०१० ते ऑगस्ट २०१४ या दरम्यान रायगड जिल्ह्यातील अलिबाग नगरपालिकेच्या मुख्याधिकारी पदाची जबाबदारी यशस्वीपणे सांभाळली. त्यानंतर ऑगस्ट २०१४ ते जून २०१७ या दरम्यान मिरा-भाईंदर महापालिकेच्या सहाय्यक आयुक्तपदी त्यांनी जबाबदारी सांभाळली. त्यानंतर जुलै २०१७ ते डिसेंबर २०२० या दरम्यान नगरपरिषद प्रशासन संचालनालय सहाय्यक संचालक पदाची जबाबदारी सांभाळल्यानंतर २३ डिसेंबर २०२० ते १८ एप्रिल २०२२ या दरम्यान ठाणे महापालिकेच्या सहाय्यक आयुक्तपदाची जबाबदारी त्यांनी अत्यंत कर्तव्यदक्षतेने आणि निर्भिडपणे निभावली आहे.

# पेण वाशी विभागात गढूळ पाणी

## ग्रामीण जलपुरवठा विभागाचे ढिसाळ नियोजन; नागरिक संतप्त

**पेण : प्रतिनिधी**

तालुक्यातील खारेपाट भागामध्ये सध्या यात्रांचा हंगाम जोरात सुरू झाला आहे, मात्र भाविकांना दरवर्षीप्रमाणे याही वर्षी गढूळ पाणी प्यावे लागल्याने संतापाची लाट पसरली.

मागील अनेक वर्षांपासून खारेपाट विभागातील वाशी, वढाव, भाल, काळेश्री, विठ्ठल वाडी, बोर्झे, लाखोले, बहिराम कोटक, तामसीबंदर, तुकाराम वाडी, कान्होंबा गावांसह अनेक वाड्या पाणीटंचाईग्रस्त आहेत. दरवर्षी टंचाईग्रस्त भागातील नागरिकांना पाणीपुरवठा करण्यासाठी पेण पंचायत समितीच्या माध्यमातून आराखडा आखला जातो आणि त्यानुसार पाणीपुरवठा केला जातो, परंतु इतर वेळीदेखील येथील नागरिकांना पाण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे.

सध्या यात्रांचा हंगाम जोरात सुरू आहे. त्यामुळे येणाऱ्या नागरिकांना किमान दोन दिवस तरी मुबलक व स्वच्छ पाणीपुरवठा करण्यात यावा याकरिता वाशी ग्रामपंचायतीने




७ एप्रिल रोजी पेण ग्रामीण पाणीपुरवठा विभागाला पत्र दिले होते. अधिकारी राठोड यांनी वाशी सरपंचांना आश्वसित केले, मात्र यात्रेच्या एक दिवस अगोदरसुद्धा पाणी आले नसून दुसऱ्या दिवशी अतिशय गढूळ, अशुद्ध व दुर्गंधीयुक्त पाणी आले.

अखेर यात्रेकरीता आलेल्या भाविकांसाठी नागरीकांनी पेण शहरातून पाणी विकत आणून त्यांची तहान भागवावी लागली यामुळे येथील नागरिकांमध्ये संतापाची लाट पसरली आहे. या गढूळ पाण्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

**हेटवणे धरणासह सिडकोच्या पाणीपुरवठ्यात काही तांत्रिक अडचणी आल्या होत्या. त्यामुळे कॅनालमधून पाणी सोडता आले नाही. या दिवसांसाठी त्यांच्याकडे नियोजन नव्हते. ते वडखळला देण्यात आले. बंद यंत्रणेमुळे वाशी गावाला पाणीपुरवठा करता आले नाही. शहापाडा धरणातील पाणी कमी झाल्याने काही अंशी ते गढूळ आले. आता पाणीपुरवठा सुरू आहे.**
**-आर. एम. राठोड, शाखा अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, पेण**

# खोपोली भाजपतर्फे सामाजिक न्याय पंधरवड्यानिमित्त उपक्रम

**खोपोली : प्रतिनिधी**

केंद्र शासन, पंतप्रधान नरेंद्र मोदी व बालकल्याण विभाग यांच्यातर्फे भारतात कुपोषित बालकांची संख्या कमी होण्यासाठी विविध योजनांच्या माध्यमातून केंद्र शासन प्रयत्नशील आहे. त्यातील प्रमुख अंगणवाडीतील बालकांना पोषणमूल्य आहार देण्यासंदर्भात हा कार्यक्रम रायगड जिल्ह्यात भाजप महिला मोर्चाच्या प्रदेश अध्यक्षा उमा खापरे यांच्या आदेशानुसार महिला मोर्चा रायगड जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील यांच्या नेतृत्वाखाली तालुक्यात राबविण्यात आला.

या पार्श्वभूमीवर खोपोली शहरातील ठाकूरवाडी बालवाडीत कार्यक्रम मंगळवारी (दि. १९)शहर महिला मोर्चाच्या वतीने झाला.

या कार्यक्रमास जिल्हा महिला मोर्चाच्या अध्यक्ष अश्विनी पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती तसेच शहर महिला मोर्चा सरचिटणीस अश्विनी अत्रे, सुमिता महर्षी, गीता मोहिते, अनिता शहा, खोपोली भाजप सरचिटणीस हेमंत नांदे, प्रमोद पिंगळे, चिटणीस गोपाळ बावस्कर, वैद्यकीय सेलचे विकास घोरपडे आदींसह अनेक कार्यकर्ते, पालक, ग्रामस्थ व विद्यार्थी उपस्थित होते.

या वेळी ५० विद्यार्थ्यांना पोषण आहारांतर्गत फळांचे वाटप करण्यात आले.

**खेड्यापाड्यातील शाळांतील कुपोषित बालकांना पोषण आहार देऊन भावी पिढी सुदृढ बनविणे यासाठी पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र शासन प्रयत्नशील आहे व त्याचाच भाग म्हणून हा कार्यक्रम देशभरात संपन्न होत आहे.**
**-अश्विनी पाटील, अध्यक्ष, जिल्हा महिला मोर्चा, भाजप**



# सीकेटी महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये रोपण करण्याच्या हेतूने जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चांगू काना ठाकूर आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज (स्वायत्त) च्या एनसीसी विभागाच्या वतीने गुरुवारी (दि. १४) महाविद्यालयाच्या संकुलात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या वेळी पनवेल रोटरी क्लबचे सदस्य राजीव राघवन यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात बुद्धवंदनेनी झाली. यानंतर महाविद्यालयाचे सहयोगी एनसीसी अधिकारी प्रो. डॉ. यु. टी. भंडारे यांनी, दिवसभरातील नियोजित उपक्रमांचा मागोवा घेतला. रोटरी क्लबचे सदस्य राजीव राघवन यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांप्रमाणे गुणवंत तथा प्रज्ञावंत बनण्याचा संदेश दिला. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांनी अध्यक्षीय भाषणात विद्यार्थांना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचार अंगीकृत करण्याचे आवाहन केले. त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनावरील पोवाड्याचे सादरीकरण झाले. एनसीसी. विभागाच्या सिटीओ प्रा. नीलिमा तिदार यांनी आभार प्रदर्शन केले. या वेळी राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. आकाश पाटील यांनी उपस्थिती दर्शविली. दिवसभरात पुस्तक वाचन, आंबेडकरांच्या जीवनावरील भाषणे, विद्यार्थी संवादसत्र, बौद्धिक सत्र आदींचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमांच्या यशस्वी नियोजनासाठी एनसीसी विभागप्रमुख प्रो. यु. टी. भंडारे, सीटीओ प्रा. नीलिमा तिदार यांनी विशेष परिश्रम घेतले.

या कार्यक्रमाचे आयोजन केल्याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरूणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी कौतुक केले.

# नवी मुंबईच्या प्रवेशद्वारावर फ्लेमिंगो करताहेत स्वागत

## ऐरोली-मुलुंड मार्गावर साकारल्या प्रतिकृती

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

स्वच्छ भारत अभियान २०२२ अंतर्गत नवी मुंबई पालिकेच्या वतीने ठिकठिकाणी रंगरगोटी, विद्युत रोषणाई, विविध प्रकारची शिल्प, संतवचने यांनी नवी मुंबईचे रुपडे पालटले आहे.

यातच नवी मुंबईचे प्रवेशद्वार असलेल्या ऐरोली-मुलुंड मार्गावरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक भवनालगत पालिकेच्या स्थापत्य विभागाने उभारलेल्या सुमारे १५ फूट उंचीच्या चार फ्लेमिंगोच्या प्रतिकृती नागरिकांचे लक्ष वेधून घेत आहेत.

नवी मुंबईची नवी ओळख फ्लेमिंगो सिटी अशी करण्यासाठी पालिकेच्या स्थापत्य विभागाने ही शक्कल लढवली आहे. सेक्टर १० येथे वनविभागाचे जैवविविधता केंद्र असून येथूनच फ्लेमिंगो सफारीसाठी अनेक जण येत असतात. यातच पालिकेने ऐरोली-मुलुंड मार्गावर प्रवेशद्वारावर फ्लेमिंगो नगरीत आपले सहर्ष स्वागत आहे, असा फलकदेखील झळकवला आहे.

नवी मुंबई पालिका आयुक्त अभिजित बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली व शहर अभियंता संजय देसाई कार्यकारी अभियंता गिरीश गुमास्ते यांच्या संकल्पनेतून आमचे स्थापत्य विभागातील अभियंते व इतर कर्मचारी वर्ग पहिला नंबर येण्यासाठी नवनवीन संकल्पना राबवत असल्याचे उपअभियंता संतोष शिकतोडे यांनी बोलताना सांगितले.







पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी

पनवेल महानगरपालिका हद्दीत
बुधवार, दि. २० एप्रिल २०२२ रोजी होणारे
कोरोना प्रतिबंधक लसीकरण
(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

कोविशिल्ड कोव्हॅक्सिन कार्बेव्हॅक्स

सर्व केंद्रांवर (वयोगट : १२ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. आय.टी.एम. कॉलेज, नवीन पनवेल ■ ३. यूपीएचसी-४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ४. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ५. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे ■ ६. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर
- ७. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
- ८. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल

**Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पुर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.**

ग्रामिण लसीकरण

भिंगारी/सागवाडी ■ घोट/कोयनावेळे ■ वळवली ■ देवीचापाडा ■ बेलपाडा/धामोळे ■ नौपाडा

**ग्रामिण लसीकरण सत्रांत दि. १८.०४.२०२२ पासून तक्त्यात नमूद केलेल्या गावामध्ये वयोगट १२-१४ यांस कार्बेव्हॅक्स व १५ ते १८ वयोगटातील लाभार्थ्यांसाठी कोव्हीक्सिन लस उपलब्ध असणार आहे.**

Precautionary Dose बाबत माहिती

- शासकीय कोविड लसीकरण केंद्रांमध्ये ६० वर्ष वरील नागरीकांना, तसेच FLW, HCW यांना दुसरा डोस घेऊन ९ महिने(३९ आठवडे/२७३ दिवस) झालेल्या लाभार्थ्यांना Precautionary Dose पुर्वी प्रमाणेच उपलब्ध होणार आहे.
- दि. १०.०४.२०२२ पासून सर्व खासगी कोविड लसीकरण केंद्रांमध्ये १८-५९ वर्ष (Year of birth 1963-2004) वरील नागरीकांचे दसरा डोस घेऊन ९ महिने(३९ आठवडे/२७३ दिवस) झालेल्या नागरीकांना Precautionary Dose उपलब्ध होणार आहे.
- खासगी कोविड लसीकरण केंद्रांमध्ये लसीकरण **सशुल्क** असणार आहे.
- **१८-५९** वय नागरीकांचे Precautionary Dose हे **फक्त खाजगी कोविड लसीकरण केंद्रांमध्ये** उपलब्ध असेल.
- या लसीकरणाकरीता **कुठलेही नविन रजिस्ट्रेशन** करण्याची आवश्यकता नाही.
- **१८-५९** वय नागरीकांचे Precautionary Dose च्या लाभार्थ्यांनी दुसऱ्या डोस चे सर्टिफिकेट/दुसरा डोस घेताना वापरलेला ID Proof व दुसऱ्या डोस करीता दिलेला मोबईल नंबर लसीकरण केंद्रावर सोबत घेऊन जावा.
- या लसीकरीताची शुल्क रु. २२५+GST + रु. १५० पर्यंत सर्विस शुल्क शासनाने ठरविले आहे. लागणार आहे. मामाजबाबदारा
- नागरीकांना लस घेताना पहिले दोन डोस ज्या लसीचे घेतले आहेत तीच लस Precautionary Dose साठी घ्यावी लागणार आहे.
- लाभार्थ्यांना कोविन अँप वर कोणत्या खासगी लसीकरण केंद्रांवर लसीकरण सुरु आहे हे दिसणार आहे त्याप्रमाणे कोविन वर Online Booking करुन किंवा प्रत्यक्ष लसीकरण केंद्रांवर देखील Booking करुन लस घेता येईल.


पान १ वरून

## पनवेल मनपा अग्निशमन दल होणार अत्याधुनिक

यासाठी दोन कोटी ४१ लाख ६३ हजार रुपयांच्या कामाला महासभेत मंजुरी देण्यात आली. कळंबोलीतील ख्रिश्चन दफनभूमीही विकसित करण्यात यावी तसेच महापालिका हद्दीतील हिंदू स्मशानभूमी विकासाची रखडलेली कामे पूर्ण करण्यात यावीत, असे सभागृह नेते परेश ठाकूर यांनी या वेळी सूचविले. याबाबत महापौरांनी प्रशासनाला पुढच्या सभेत त्याची माहिती देण्यास सांगितले.

पूर्वाश्रमीच्या नगर परिषदेमार्फत सहा वाणिज्य संकुलातील ३० वर्षांच्या कालावधीकरिता भाडे तत्त्वावर देण्यात आलेले गाळे लीज करारनामा व हस्तांतर करण्यास मान्यता मिळण्यासाठी प्रस्ताव या वेळी मांडण्यात आला, पण नगरसेवकांना त्याची पूर्ण माहिती देण्यात आली नव्हती. त्यामुळे तो विषय स्थगित ठेवण्यात आला.

पनवेल शहरातील कृष्णाळे तलावाच्या बाजूला असलेल्या पार्किंगमध्ये झोपणाऱ्या गजरेवाल्यांचा विषय नगरसेविका रूचिता लोंढे यांनी प्रश्नोत्तराच्या वेळी काढला. त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल, असे आयुक्तांनी उत्तर देताना सांगितले.


महासभेत झालेल्या चर्चेमध्ये नगरसेवक प्रकाश बिनेदार, नितीन पाटील, डॉ. अरुणकुमार भगत, हरेश केणी, बबन मुकादम, नगरसेविका रूचिता लोंढे आदींनी सहभाग घेतला.

## अल्पवयीन मुलीचा संशयास्पद मृत्यू

**कर्जत** : तालुक्यातील पाथरज-धोत्रेवाडी येथे एका अल्पवयीन मुलीचा मृतदेह संशयास्पदरित्या आढळला आहे. या प्रकरणी पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. धोत्रेवाडी येथील १७ वर्षीय मुलीचा मृतदेह गावाबाहेर झाडाखाली आढळला. पोलिसांनी हा घातपात की आत्महत्या याबाबत तपास सुरू केला आहे.

## दुखवटा

### तुळसाबाई ठाकूर



**उरण :** तुळसाबाई किसन ठाकूर (६४) यांचे रविवारी (दि. १६) सकाळी घोडबंदर किल्ला, मीरा-भाईंदर येथील राहत्या घरी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर घोडबंदर येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुले, मुली, नातवंडे असा परिवार आहे.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या प्रयत्नांमुळे कामगारांना न्याय

## उरणच्या कॉन्वेअर सीएसएफ वेअरहाऊसमधील प्रश्न मार्गी; तीन महिन्यांची मुदतवाढ





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पंजाब स्टेट कंटेनर वेअरहाऊसिंग कॉर्पोरेशनच्या कॉन्वेअर सीएसएफ या वेअरहाऊसमधील कामगारांना माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यामुळे न्याय मिळाला आहे. या वेअरहाऊससाठी जीएडी लॉजिस्टीकला तीन महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली आहे. त्याबद्दल कामगारांनी लोकनेते रामशेठ ठाकूर आणि जय भारतीय कामगार संघटनेचे अध्यक्ष जितेंद्र घरत यांचे आभार मानले आहेत.

उरण तालुक्यातील धुतूम येथे पंजाब स्टेट कंटेनर वेअरहाऊसिंग कॉर्पोरेशनच्या कॉन्वेअर सीएसएफ वेअरहाऊस हे जानेवारी ते मार्च असे तीन महिने बंद होते. या वेअरहाऊसाठी तीन वेळा टेंडर काढण्यात आले होते, मात्र कोणीही टेंडर भरले नाही. त्यामुळे वेअरहाऊसमध्ये काम करणाऱ्या सुमारे ३५० स्थानिक कामगारांच्या रोजगाराचा प्रश्न निर्माण झाला होता. स्थानिकांच्या कामाच्या प्रश्नासंदर्भात भारतीय जनता पक्ष पुरस्कृत जय भारतीय कमागार संघटनेचे अध्यक्ष जितेंद्र घरत यांनी अनेक वेळा चर्चा केली.

अखेर या कामगारांच्या प्रश्नाबाबत माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी प्रयत्न केले. त्यानुसार या वेअरहाऊससाठी जीएडी लॉजिस्टीकला तीन महिन्यांसाठी मुदतवाढ देण्यात आली असल्याने कामगारांचा कामाचा प्रश्न सुटला आहे. त्या अंतर्गत या पंजाब स्टेट कंटेनर वेअरहाऊसिंग कॉर्पोरेशनच्या कॉन्वेअर सीएसएफ वेअरहाऊसचे गेट माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते सोमवारी (दि. १८) श्रीफळ वाढवून उघण्यात आले.

या वेळी जय भारतीय कामगार संघटनेचे अध्यक्ष जितेंद्र घरत, जीएडी लॉजिस्टीकचे मॅनेजिंग डारयेक्टर जमीर शेख यांच्यासह पदाधिकारी आणि कामगार उपस्थित होते.



# नगरसेविका दर्शना भोईर यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा

**पनवेल : राम्रपहर वृत्त**



भाजपच्या महाराष्ट्र प्रदेश सदस्या, रायगड जिल्हा नियोजन समिती सदस्या तथा नगरसेविका दर्शना भोईर यांचा वाढदिवस मंगळवारी (दि. १९) विविध सामाजिक उपक्रमांनी मोठ्या उत्साहात साजरा झाला. वाढदिवसाचे औचित्य साधून शहरातील रोझ बाजरमध्ये फुफ्फुसांची क्षमता तपासणी शिबिराचे अयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते आणि महापौर डॉ. कविता चौतमोल यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्घाटन झाले.

या वेळी उपमहापौर सीताताई पाटील, नगरसेवक अनिल भगत, राजू सोनी, नितीन पाटील, महिला मोर्चा पनवेल शहर अध्यक्षा वर्षा नाईक, सुहासिनी केकाणे, कामगार नेते रवी नाईक, सपना पाटील, कविता पाटील, अरुणा पाटील, इंदुताई कोल्हे, सुमती काठे, मंदा राऊत, साहेबराव घुमरे, अत्माराम लवाटे, कांता लवाटे, रंजना जितेकर, अंजली इनामदार, अक्षया चितळे, संतोष ढगे, राजू कोळी, राकेश जाधव, अनंत गुरज, प्रसाद म्हात्रे, सुमन काझी, यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

वाढदिवसानिमित्त शुक्रवारी (दि. २२) योजना आपल्या दारी हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. यामध्ये काही निवडक योजनांची माहिती नागरिकांना देऊन त्याचा लाभ घेण्यासाठी नोंदणी कार्यक्रमही घेण्यात येणार आहे. या उपक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन नगरसेविका दर्शना भोईर यांनी केले आहे.



**उरण : अंगारक संकष्ट चतुर्थीनिमित्त भाजप पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी मंगळवारी चिरनेर येथील गणपती मंदिरात जाऊन दर्शन घेतले. या वेळी त्यांचे स्वागत करण्यात आले.**



**मोहोपाडा : रसायनीतील कांबे येथील सागर कुरंगळे यांची ऑल इंडिया पोलीस जनसेवा संघटनेच्या रायगड जिल्हा उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. याबद्दल भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी त्यांचे अभिनंदन केले.**

# उरण एसटी कर्मचारी हजर झाल्याने बससेवा पूर्ववत

**उरण : प्रतिनिधी**

मुंबई विभागाच्या उरण एसटी आगारात संपकरी कामगार हळूहळू पुन्हा कामावर येण्यास सुरुवात झाली असून २३० कर्मचाऱ्यांपैकी सुमारे २०० कर्मचारी कामावर रुजू झाले आहेत. त्यामुळे ५० टक्क्यांहून अधिक बससेवा सुरू झाली असल्याची माहिती उरण एसटी आगाराचे प्रमुख सचिन मालशे यांनी दिली आहे.

ऑक्टोबर २०२१ पासून राज्यातील एसटी कर्मचारी संपावर गेले होते. सहा महिने सुरू असलेल्या संपामधील उरण एसटी आगारातील सुमारे २०० कर्मचारी परतले आहेत. जे कर्मचारी परतले आहेत. त्यामधील सर्व कर्मचाऱ्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली आहे, तसेच वाहकांना पुन्हा प्रशिक्षण देण्यास सुरुवात करण्यात आली आहे.

या आगोदर उरण एसटी वाहतूक ही सेवा पाच टक्के सुरू करण्यात आली होती, परंतु आता कामगार कामावर रुजू झाल्याने ५० टक्क्यांपर्यंत गेली आहे. सध्या दादर, ठाणे, वाशी, पनवेल, अलिबाग, पेण तसेच ग्रामीण भागात सर्वत्र बससेवा सुरू करण्यात आली असल्याची माहिती सचिन मालचे यांनी दिली आहे.



# पिरकोनमध्ये गॅस हाताळणीबाबत प्रात्यक्षिकासह जनजागृती

**उरण : बातमीदार**

तालुक्यातील पिरकोन गावात सूर्या गॅस कंपनी कर्मचारी प्रतिक्षा म्हात्रे हिने गॅस हाताळणी कशी करायची याबाबत योग्य ती माहिती पिरकोन गावातील भाजपचे उरण तालुका उपाध्यक्ष मुकुंद गावंड यांच्या निवासस्थानी नागरिकांना प्रात्यक्षिके देऊन दिली.

गॅस हाताळणीविषयी प्रत्यक्षिके व जनजागृती घराघरात व्हायला पाहिजे आणि ती काळाची गरज असल्याचे भाजप तालुका उपाध्यक्ष मुकुंद गावंड यांनी या वेळी सांगितले.

या वेळी उपसरपंच दिपाली पाटील, ग्रा. पं. सदस्य संतोष गावंड, सुरेंद्र गावंड, प्रा. प्रमोद म्हात्रे, ज्येष्ठ कार्यकर्ते मंगेश गावंड, गणेश म्हात्रे, महेंद्र पाटील, वैभव गावंड, युवा कार्यकर्ते चंद्रकांत गावंड, महेश गावंड, गणेश महिला मंडळ बचतगटाच्या अध्यक्ष लक्ष्मी गावंड, सचिव बिंदू गावंड, अलका गावंड, योगिता गावंड, शारदा गावंड, बेबी गावंड, अक्षता गावंड, दिव्या गावंड, हेमाक्षी गावंड, समिक्षा गावंड, दर्शिता गावंड आदी उपस्थित होते.

## ड्रोनच्या नजरेतून करळ फाटा



उरण : जेएनपीएने वाहतूक कोंडीवर उपाय म्हणून करळ फाटा येथे सुमारे ३५० कोटी खर्च करून फुलपाखराच्या आकाराचा इंटरचेंज पूल उभारला आहे. केंद्रीय वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांच्या मार्गदर्शनाखाली व आमदार महेश बालदी यांच्या प्रयत्नाने हा पूल वाहतुकीसाठी खुला करण्यात आला. या भव्य पुलाचे लक्ष्मण ठाकूर यांनी ड्रोनद्वारे टिपलेले छायाचित्र.

# चिंध्रण सरपंच कमला देशेकर यांच्या प्रयत्नातून लोहार समाजाला निधीवाटप



**कळंबोली : प्रतिनिधी**

चिंध्रण सरपंच कमला देशेकर यांच्या प्रयत्नातून ग्रामपंचायतीच्या २०२२-२३ या आर्थिक वर्षाच्या उत्पन्नाच्या १५ टक्के निधीतून एनटीबी विश्वकर्मा लोहार समाजाला भांड्यांच्या स्वरूपात वाटप करण्यात आले. त्याचप्रमाणे अपंगांना पाच टक्के निधीतून जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले. त्यामुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

या वेळी जिल्हा परिषदेचे सदस्य व ओबीसी सेलचे अध्यक्ष एकनाथ देशकर, उपसरपंच शंकर देशेकर, सदस्य गणपत कडू, सदस्य नरेश सोनवणे, सुरेश मुंबईकर, भालचंद्र कदम, रमेश कदम, गोपीनाथ भागिवंत, यशवंत कदम, वाळकू भागिवंत आर्दीसह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.



**पनवेल : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या योजनेनुसार भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर तसेच महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील यांच्या मार्गदर्शनानुसार खारघर-तळोजा महिला मोर्चाच्या वतीने मंगळवारी अंगणवाडीतील मुलांना फळे, राजगिऱ्याचे लाडू, बिस्किट वाटप करण्यात आले. या वेळी महिला मोर्चा खारघर तळोजा अध्यक्ष वनिता पाटील, मीडिया सेल जिल्हा संयोजिका मोना अडवाणी, महिला मोर्चा खारघर तळोजा सरचिटणीस साधना पवार, उपाध्यक्ष आशा बोरसे आणि इतर पदाधिकारी, कार्यकर्त्या महिला उपस्थित होत्या.**

वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी
राम प्रहर

## राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : १७

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत 'राम प्रहर'च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सअॅप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).

**१. युक्रेन आणि रशियाकडून गहू आयात करणाऱ्या कोणत्या देशाने आता भारताकडून गहू आयातीचा निर्णय घेतला आहे?**

***अ.*** जर्मनी ***आ.*** ब्रिटन
***इ.*** इजिप्त ***ई.*** क्युबा

**२. शेअर बाजारात गुंतवणूक करण्यासाठी काढावे लागणारे डीमॅट खाते कोणत्या संस्था देतात?**

***अ.*** सेबी आणि रिझर्व बँक ***आ.*** सेबी आणि एनएसडीएल
***इ.*** सेबी आणि सीडीएसएल ***ई.*** एनएसडीएल आणि सीडीएसएल

**३. आठ एप्रिल रोजी संपलेल्या आठवड्यात भारताकडे परकीय चलनाचा साठा किती होता?**

***अ.*** ६०४ अब्ज डॉलर ***आ.*** ६४२ अब्ज डॉलर
***इ.*** ६०० अब्ज डॉलर ***ई.*** ६२५ अब्ज डॉलर

Save More - Get Pure
E-store India
India's Widest SWADESHI Supermarket
India's Next Retail Revolution
BEST PRICE SUPERMARKET
ASSURED MINIMUM 4% OFF ON ALL PRODUCTS
UPTO 33% OFF
Sai Sarang Co-op Society, Shop No.1&2, Momin Pada, Tapal Naka,Old Panvel, Pin - 410 206.

**टीप :** वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील 'ई-स्टोर इंडिया'तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!**

## संपादकीय

# पोलखोल तर होणारच!


आगामी मुंबई महापालिका निवडणुकीच्या तोंडावर आपल्या आजवरच्या कारभाराची चिरफाड होणार या विचाराने सत्ताधारी भ्रष्टाचाऱ्यांच्या गोटात अस्वस्थता पसरणे स्वाभाविकच होते. त्यामुळेच भाजपच्या पोलखोल मोहिमेतील रथाची काही अज्ञातांनी सोमवारी मध्यरात्री तोडफोड केली. भाजपची ही रथयात्रा मंगळवारी मुंबईतील चेंबूर कॅम्प येथील भाजप कार्यालयातून सुरू व्हायची होती. अर्थात, भाजप अशा भ्याड हल्ल्यांनी मागे हटणार नाही हे सत्तेच्या खुर्च्यांना चिकटून बसलेल्यांनाही पुरते ठाऊक आहे.

**जगाच्या किंवा देशाच्या कुठल्याही कानाकोपऱ्यातून मुंबई शहरात आलेल्या माणसाला आल्याक्षणी भावते ती या शहराची मानसिकता, येथील दुर्दम्य जीवनासक्ती. येथील लोकांची मदत करण्याची वृत्ती, शिस्तप्रियता, या शहराचा वेग, त्याचे अखंड कार्यमग्न राहणे सारे-सारे येथे येणाऱ्यांना लुभावून जाते, मात्र सगळ्यांनाच खटकते ती या शहराची बकाली, अस्वच्छता, खड्डे पडलेले रस्ते, प्रचंड वाहतूक कोंडी, जिथे पहावे तिथे दिसणारी माणसांची गर्दी आणि सुविधांचा अभाव. देशाच्या अनेक भागांत गेल्या काही वर्षांत मोठी प्रगती झालेली दिसून येते. तेथील स्वच्छ रस्ते, उद्याने, उद्योगधंदे नजरेत भरतात. प्रगतीच्या त्या झपाट्याची मुंबईशी तुलना केली तर मात्र काय दिसते? एक आंतरराष्ट्रीय शहर असूनही मुंबई मात्र बदलताना दिसत नाही. कोणी जखडून, रोखून ठेवले आहे मुंबई शहराला प्रगतीच्या वाटेवर जाण्यापासून? ४० हजार कोटींहून अधिक रुपयांचा अर्थसंकल्प असलेल्या या महानगराची अवस्था अशी दयनीय का? गेली अनेक दशके मुंबई महापालिकेला आपल्या विळख्यात घेऊन बसलेल्या पालिकेतील सत्ताधारी शिवसेनेचा कारभार कसा आहे हे काही लपून राहिलेले नाही. अनेक वर्षे भ्रष्टाचाराचे कुरण बनून राहिलेल्या शिवसेनेच्या येथील सर्व घोटाळ्यांची पोलखोल करण्याचा निर्धार भारतीय जनता पक्षाने केला आहे. या पोलखोल अभियानाची घोषणा होताच शिवसेनेच्या गोटात धाबे दणाणणे अपेक्षितच होते. अलीकडेच एका भ्रष्टाचार प्रकरणात सक्तवसुली संचलनालयाने (ईडी) शिवसेनेचे नेते संजय राऊत यांच्या निकटवर्तीयांच्या ११ मालमत्तांवर टाच आणली. तेव्हापासून शिवसेनेच्या नेत्यांमध्ये घबराटीचे वातावरण आहे. त्यामुळेच आमचा घाव सत्ताधाऱ्यांच्या वर्मी बसल्यामुळे त्या अस्वस्थतेतूनच रात्रीचा हा हल्ला करण्यात आला, पण असे कितीही हल्ले झाले तरी भ्रष्टाचाराची पोलखोल भाजप करीतच राहील असा निर्धार विधानसभा विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी या हल्ल्यानंतर व्यक्त केला. विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर यांच्या हस्ते रथयात्रेची सुरुवात झाली. शिवसेनेने गुंडांना हाताशी धरून पोलखोल रथाची तोडफोड केल्याचा आरोप या वेळी दरेकर यांनी केला. तोडफोड करणाऱ्या आरोपींना संध्याकाळपर्यंत अटक न झाल्यास ठिय्या आंदोलन करण्याचा इशाराही त्यांनी दिला. त्यानंतर पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज तपासून चौघांची ओळख पटवल्याचे समजते. असे हल्ले भारतीय जनता पक्षाला मुंबई महापालिकेतील भ्रष्टाचाराचा बुजबुजाट चव्हाट्यावर आणण्यापासून तीळमात्रही रोखू शकणार नाहीत हे तर सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ आहे. शिवसेनेने कायम या पालिकेला सोन्याचे अंडे देणारी कोंबडी असल्यासारखेच वागवले आहे. इतकी वर्षे आपण येथील सत्ता बळकावून आहोत, आपण या शहराचे काही देणे लागतो याचे भान या पक्षाला नाही. ते फक्त हक्काची भाषाच बोलत आले आहेत. या हक्काच्या भावनेतूनच बहुदा त्यांनी या शहराला लुबाडून आपल्या तुंबड्या भरल्या आहेत, पण आता त्यांच्या भ्रष्ट कारभाराची लक्तरे वेशीवर टांगल्याशिवाय भाजप स्वस्थ बसणार नाही.**

# पुस्तक प्रकाशन, ग्रंथव्यवहार आणि तंत्रज्ञान

एक काळ होता की जेव्हा लेखकाचं पुस्तक छापलं जाणं हा परदेशगमनाच्या योगापेक्षाही अवघड योग होता. कितीही उत्तम लिखाण असो लेखकाला 'नाव' नसेल तर प्रकाशक त्याला उभा करीत नसत. पुस्तक प्रकाशित करणे आणि वाचकांपर्यंत पोहचवणे ही त्या काळी प्रकाशकाची शंभर टक्के मक्तेदारी होती. एखादा नवोदित लेखक हस्तलिखित दाखवायला आला की प्रकाशक त्याकडे काहीशा गुर्मीतच पहात असे. लिखाण न वाचता पुस्तक नाकारणे ही त्या गुर्मीची पुढली पायरी असे. परिणामी खूप प्रयत्न करूनही प्रकाशक मिळाला नाही आणि म्हणून दुर्दैवाने पुस्तक निघू शकले नाही हा अनुभव उदयोन्मुख लेखकांच्या पाचवीला पुजलेला असे. अशा परिस्थितीत पुस्तक निघाले नाही, त्यामुळे ते लिखाण वाचकांपर्यंत पोचले नाही आणि लिखाणाचे ते हस्तलिखित बाड लेखकाच्याच कपाटात पडून राहिले असे होई. असे असंख्य अनामिक गुणवंत लेखक गतकाळात आपापल्या कपाटात आपापले अप्रकाशित हस्तलिखित लिखाण सोडून हे जगही सोडून गेले, पण आता परिस्थिती बदलली आहे.

लेखकाला त्याचे पुस्तक सहजपणे आणि माफक खर्चात प्रकाशित करता येईल व मुख्य म्हणजे देशभरच्या कानाकोपऱ्यातल्या सर्व वाचकांपर्यंत ते पुस्तक विक्रीच्या माध्यमातून विनासायास पोहचवता येईल अशी स्थिती आज सुदैवाने दोन कारणांमुळे निर्माण झाली आहे. ती



दोन्ही कारणे हा आजच्या प्रगत तंत्रज्ञानाचा भाग आहेत. ज्यांच्यावर प्रकाशक प्रसन्न व्हायला तयार नाही अशा आजच्या लेखकाने ही दोन्ही कारणे आणि त्या मागील तंत्र बारकाईने लक्षात घेणे नितांत आवश्यक आहे. आणि हो, हे काही मोठे रॉकेट सायन्सही नाही. त्या खरंतर चार दोन व्यावहारिक टीप्स किंवा फार तर ट्रीक्सच आहेत.

आजच्या पिढीतल्या अनेकांना, खरंतर त्या प्रगत तंत्रज्ञानाची कल्पना आहे, मात्र त्यातल्याही अनेकांना एका पुस्तकाच्या छपाईसाठी आज नेमका सरासरी खर्च किती येतो याची सुस्पष्ट कल्पना नसण्याची शक्यता आहे. त्याचे कारण स्वाभाविक आहे. पुस्तक तयार करून ते छापण्याचा प्रत्यक्ष अनुभव अनेकांना नसतो. जी असते ती वरवरची ऐकीव आणि बरेचदा अवास्तवाकडून नाउमेदीकडे नेणारी आजच्या संदर्भात कालबाह्य झालेली टरफली माहिती. या अवास्तव माहितीमुळेही आजचे कितीतरी सकस लेखन प्रकाशनापासून वंचित राहते.

या टप्प्यावर क्षणभर गृहित धरू की छपाईचे इथून तिथून काहीतरी जमवले आणि पुस्तक छापले. एकदाच्या त्या ५०० प्रती हाती आल्या, पण प्रती आल्या म्हणजे काम झाले असा प्रकार नसतो. खरा चक्रव्यूह आणि आव्हान त्या पुढेच सुरू होतो. पुस्तकाच्या प्रतींचे छापून आलेले गठ्ठे समोर दिसत असतात. त्यातल्या पहिल्या पाच-पन्नास प्रती हौसेने 'सप्रेम भेट' शब्दाखाली लेखकाची फर्राटेदार सही होऊन फुकट जातात. म्हणजे चकटफू वाटल्या जातात. बाकीच्या प्रतींचं काय करायचं? मोठाच प्रश्न असतो. मग पुस्तक वितरकाचा शोध सुरू होतो.

त्या वितरकाने महाराष्ट्र भरच्या ग्रंथविक्रेत्यांना म्हणजे पुस्तकांच्या दुकानांना आपले पुस्तक विक्रीसाठी द्यावे अशी लेखकाची अपेक्षा असणे स्वाभाविक आहे, पण या संदर्भातील म्हणजे पुस्तक वितरण प्रक्रियेच्या संदर्भातील आजची २०२२ सालातली परिस्थिती अतिशय दयनीय आहे. पुस्तक वितरक नावाचा प्राणी आज नामशेष झालेला आहे. वितरक का नामशेष झाला? कारण त्याची सतत शिकार होत राहिली. ती शिकार कोणी केली? ती शिकार पुस्तक विक्रेत्या दुकानदारांनी केली. वितरक प्रकाशक किंवा लेखकाकडून वितरणासाठी पुस्तकांच्या प्रती घेतो. त्या महाराष्ट्रभर वेगवेगळ्या जिल्ह्यातल्या वा तालुक्यातल्या दुकानांकडे विक्रीसाठी देतो. दुकानाने ४० टक्के कमिशनने प्रती विकाव्या आणि वितरकाला विक्रीची रक्कम कमिशन कापून द्यावी अशी बोली असते. दुकानदाराने 'ऑन सेल पेमेंट' द्यावे, वितरकाने दुकानदाराकडून वसुली करून प्रकाशक वा लेखकाच्या प्रतींचे पैसे द्यावेत असा व्यवहार असतो. प्रकाशक वा लेखक छपाईचे बिल देऊन पैसे गुंतवून व अडकवून बसलेला असतो. विक्री व्यवहार सगळा क्रेडिटवर आधारलेला असतो. पुढे हमखास असे होते की दुकानदार पुस्तकाच्या प्रती गिर्हाईकांना रोखीने विकतो, पण वितरकाचे पैसे रखडवतो. नंतर बहुतेकदा बुडवतो. या कारणाने वितरक प्रकाशक वा लेखकाला त्याचेकडून घेतलेल्या प्रतींचे पैसे देऊ शकत नाही. बरेचदा वितरकच बदमाषी करतो. दुकानदाराकडून पैसे वसूल करूनही मिळाले नाही सांगून गंडा घालतो. या कारणाने वितरक नामक प्राण्यावरचा विश्वास उडून तो आता ग्रंथव्यवहारातून नामशेष झाला आहे.

आता अशा परिस्थितीत प्रकाशक मंडळींना पुस्तक प्रदर्शनाचा आधार असतो. तिथे रोख विक्री होते. पैसे बुडत नाहीत, पण पुस्तक प्रदर्शनात नवोदित लेखकांची पुस्तके कोण विकत घेणार? तिथे विक्री होते ती पु. लं.सारख्या ख्यातनाम लेखकांच्या हॉट केक पुस्तकांची. म्हणजे नवलेखकांची पुस्तके प्रदर्शनात फार तर तो संबंधित लेखक स्वतःचे स्वतःच जे खरेदी करेल तेवढेच. त्यामुळे प्रदर्शनासाठी वाहतूक करून पुस्तके नेताना विक्रेता फक्त चलनी खपणारी पुस्तके गाठोड्यात बांधत असतो.

नवोदित लेखकाला स्वतःचे पुस्तक वाचकांपर्यंत पोहचवण्याचे वरदान देणारी ती दोन उपरोल्लेखित कारणे आणि तंत्र समजून घेण्यापूर्वी २०२० आणि २०२१ या गेल्या दोन वर्षांत पारंपारिक ग्रंथविक्री व्यवहाराचे जे कंबरडे मोडले त्याकडे डोळसपणाने पाहिले पाहिजे. या काळात पुस्तकांची अनेक दुकाने बंद झाली. पुस्तक ही दुकानात जाऊन खरेदी करण्याची वस्तू राहिली नाही. पुस्तके आता ऑनलाइन खरेदी करण्याची वस्तू बनली आहे. पुस्तकांची दुकाने ही २०२५च्या टप्प्यावर फक्त गतकाळातील आठवण म्हणूनच उरेल, असा अंदाज काही जण आज व्यक्त करताना दिसतात.

आता एवढं जाणून घेतल्यानंतर आपण त्या वरदानसदृश दोन कारणांकडे आणि तंत्राच्या भागाकडे वळू. पहिले तंत्र छपाईचे आहे. पूर्वीच्या तंत्रात पुस्तकाच्या किमान ५०० प्रती छापाव्या लागत. त्यापेक्षा कमी प्रती छापायला प्रिंटर तयार होत नसे. मोठ्या मिनतवारीने त्याला तयार केला, तर तो छपाईचा दर इतका चढा सांगे की, सारे गणितच कोलमडून जाई. आपल्याकडे आजही पुस्तकाच्या प्रतींचा दर पृष्ठसंख्येशी निगडित असतो. म्हणजे २०० पानी पुस्तकाचा दर २०० रुपये व ५०० पानी पुस्तकाचा दर ५०० रुपये अशा किमती ठेवल्या जातात. दोनशे पानी पुस्तक चारशेला ठेवाल, तर गिहाईकाच्या चेहऱ्यावरील भाव असा दिसेल की जणू एक झेरॉक्स कॉपी मारण्याचा दर दहा रुपये सांगताहेत. त्या खेरीज पानाला रुपयापेक्षा अधिक दर ठेवला, तर पुस्तक विकत घेण्यापेक्षा पानांच्या झेरॉक्स मारणे लोकांना हुशारीचे आणि किफायतशीर असे दोन्ही वाटते.

आता यावर उपाय नव्या तंत्रज्ञानाने उपलब्ध केला आहे. ते तंत्र प्रिंट ऑन डिमांड या नावाने सर्वश्रुत आहे. यात अगदी दोन-पाच प्रतीही छापता येतात. अर्थात ५० किंवा १०० प्रती छापून घेता येतात. जर २०० पानी ३०० प्रती छापल्या, तर एका प्रतीचा (छपाईचा) खर्च सामान्यत: ७० रुपये येतो. प्रिंटर नुसार तो १०-२० रुपये कमी-अधिक असू शकतो. यात पेजिनेशनचा म्हणजे पाने लावण्याचा खर्च अंतर्भूत नाही. पाने लावण्याचा खर्च अदमासे ४० ते ८० रुपयांदरम्यान असू शकतो. ४० रुपये दराने प्रोफेशनलने २०० पाने लावून दिली असे धरले, तर पेजिनेशनचे आठ हजार रुपये आणि छपाईचे २५ हजार असे एकूण ३३ हजार होतात. यात आपल्याला ३०० प्रती मिळतात. एका प्रतीची छपाई किंमत ११० रुपये होते.

या पीओडी तंत्राने पुस्तक छपाई करणारे आता मोठ्या शहरांमध्ये खूप प्रिंटर्स आहेत. आपण छपाईचे हे तंत्र पाहिले. ते आता बऱ्यापैकी रूळले आहे. आता पुस्तके छापून झाल्यानंतरचा म्हणजे वितरण व विक्रीचा भाग पाहू. वर स्पष्ट केल्याप्रमाणे पुस्तक दुकानांचा विक्रीसाठी शोध घेणे, संपर्क करणे, तिथे वाहतुकीने पुस्तके पाठवणे, विक्रीनंतर वसुली करणे हे सारे अक्षरशः अशक्यप्राय आहे. ते करण्यात वेळ व शक्ती घालवणे हा सुज्ञपणा नव्हे. त्या ऐवजी ॲमेझॉन, फ्लिपकार्टसारख्या ऑनलाईन माध्यमातून आपली पुस्तके भारतभरातील वाचकांसाठी उपलब्ध करणे हा सर्वोत्तम मार्ग आहे. अमेझॉनवर आपली पुस्तके अधिकृत वितरकामार्फत विकणेच श्रेयस्कर असते. त्या अधिकृत विक्रेत्याला फक्त दहा प्रती विक्रीसाठी द्यायच्या असतात. त्यांची विक्री झाली आणि त्याचे पैसे मिळाले की पुढील दहा प्रती द्यायच्या अशी पद्धत असल्याने रिस्क फॅक्टर मर्यादित असतो. अगदी २५० रुपये छापील किमतीच्या दहा प्रती म्हणजे एकूण जोखीम फक्त २५०० रुपयांची. त्यातलेही ४० टक्के विक्रेत्याचे कमिशन वजा केले, तर निव्वळ जोखीम फक्त १५०० रुपयांची उरते. अशा तऱ्हेने लेखकाची पुस्तके सहजपणे सर्वत्र पोहचतात. **-विश्वनाथ खांदारे**



## बदलते तंत्रज्ञान



### व्हॉट्सॲपमध्ये आणखी नवी फिचर्स

लवकरच व्हॉट्सॲप आपल्या यूजर्सना नवीन फिचर्स देणार आहे. या फिचर्समुळे युजर्स आता ग्रुप व्हॉईस कॉलवर अधिक लोकांना जोडू शकतील आणि मोठ्या फाईल्स दुसर्या व्हॉट्सॲप युजर्संना सहजतेने पाठवू शकतील.

व्हॉट्सॲपने जाहीर केले की, ३२ लोकांना ग्रुप व्हॉईस कॉलमध्ये सहभागी होण्याची आणि दोन जीबीपर्यंतच्या फाइल्स शेअर करण्याची परवानगी देईल. याशिवाय व्हॉट्सॲपने आणखी अनेक नवीन फिचर्स देण्याची घोषणा केली आहे. सध्या मोबाईल ॲप वापरून ग्रुप व्हॉईस कॉलमध्ये फक्त आठ लोकांना जोडता येते तसेच युजर्स एक जीबीपेक्षा जास्त फाइल इतर कोणत्याही युजर्सला शेअर करू शकत नव्हते.

व्हॉट्सॲप चॅट ग्रुपच्या ॲडमिनला कधीही मेसेज डिलीट करण्याची परवानगी देईल. कंपनीच्या प्रवक्त्याने सांगितले की, डिलीट केलेले चॅट ग्रुपमधील कोणत्याही सदस्याला दिसणार नाही. मेटा प्लॅटफॉर्मचे सीईओ मार्क झुकरबर्ग यांनी एका पोस्टमध्ये म्हटले आहे की, आम्ही व्हॉट्सॲपवरील ग्रुप्समध्ये फीडबॅक, मोठ्या फाइल शेअरिंग आणि मोठ्या ग्रुप कॉलसह नवीन वैशिष्ट्ये देत आहोत. मात्र, व्हॉट्सॲपमध्ये हे नवीन फिचर्स कधी जोडले जातील याबाबत कंपनीकडून कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही. व्हॉट्सॲपचे जगभरात दोन अब्जाहून अधिक सक्रिय युजर्स आहेत. एका अहवालानुसार व्हॉट्सॲपचे जगात सर्वाधिक युजर्स भारतात आहेत. ज्यांची संख्या सुमारे ४८.७ कोटी आहे.

दुसरीकडे मुंबईतील वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर मार्गावर मेट्रो सेवा चालविणाऱ्या मुंबई मेट्रो वन प्रायव्हेट लिमिटेडने (एमएमओपीएल) व्हॉट्सॲपवर 'ई-तिकीट' सुविधा सुरू केली. एमएमओपीएलने सांगितले की, मुंबई मेट्रो वन मेसेजिंग ॲप हे व्हॉट्सॲपवर ई-तिकीट ऑफर करणारे जगातील पहिले एमआरटीएस (मास रॅपिड ट्रान्झिट सिस्टम) आहे. याद्वारे व्हॉट्सॲपवर सहजपणे ई-तिकीट मिळू शकते. याशिवाय प्रवाशांसाठी 'पेपर क्यूआर तिकिटे'ही उपलब्ध असतील.

# भारताच्या लष्करप्रमुखपदी पुन्हा महाराष्ट्रवीर



लेफ्टनंट जनरल मनोज पांडे हे भारताचे पुढील लष्करप्रमुख असणार आहेत. ते लष्करप्रमुख एमएम नरवणे यांची जागा घेतील. या पदावर पोहोचणारे ते पहिले अभियंता अधिकारी आहेत. सध्या लष्कराचे उपप्रमुख म्हणून काम पाहणारे पांडे हे नरवणे यांच्यानंतर लष्करातील सर्वांत वरिष्ठ अधिकारी आहेत. ते १ मे रोजी २९ वे लष्करप्रमुख म्हणून पदभार स्वीकारतील. विशेष म्हणजे पांडेदेखील नरवणे यांच्याप्रमाणेच महाराष्ट्राचे रहिवासी आहेत.

नॅशनल डिफेन्स अकादमीचे पदवीधर असलेले मनोज पांडे १९८२ मध्ये कॉर्प्स ऑफ इंजिनियर्समध्ये नियुक्त झाले. जम्मू आणि काश्मीरमधील नियंत्रण रेषेजवळ पल्लनवाला सेक्टरमध्ये ऑपरेशनपराक्रम दरम्यान त्यांनी इंजिनियर रेजिमेंटचे नेतृत्व केले. आपल्या कारकिर्दीत त्यांनी अनेक महत्त्वाच्या पदांवर काम केले असून दहशतवादविरोधी कारवायांमध्ये त्यांचा सहभाग होता.

लष्कराचे उपप्रमुख होण्यापूर्वी ते लष्कराच्या पूर्व कमांडचे प्रमुख होते. ही कमांड सिक्कीम आणि अरुणाचल प्रदेशातील प्रत्यक्ष नियंत्रण रेषेचे रक्षण करण्यासाठी जबाबदार आहे. लेफ्टनंट जनरल पांडे यांनी अंदमान आणि निकोबार कमांडचे प्रमुख म्हणूनही काम केले आहे. मनोज पांडे हे जून २०२० ते मे २०२१पर्यंत अंदमान आणि निकोबार


## निमित्त

कमांडचे कमांडर-इन-चीफ होते. याशिवाय त्यांनी पश्चिम लडाखच्या उंच भागात पर्वतीय विभाग आणि ईशान्येकडील एका सैन्यदलाचे नेतृत्व केले.

डिसेंबर २००१ मध्ये संसदेवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर, ऑपरेशन पराक्रमचा भाग म्हणून पश्चिम सीमेवर मोठ्या प्रमाणावर शस्त्रे आणि सैन्य तैनात करण्यात आले होते. ही घटना घडली तेव्हा भारत आणि पाकिस्तानमध्ये युद्धाची परिस्थिती होती. लेफ्टनंट जनरल मनोज पांडे यांनी जम्मू आणि काश्मीरमधील ऑपरेशन पराक्रमदरम्यान नियंत्रण रेषेजवळ इंजिनियर रेजिमेंटचे नेतृत्व केले. यासह त्यांनी पश्चिम सेक्टरमध्ये एक अभियंता ब्रिगेड, नियंत्रण रेषेजवळ पायदळ ब्रिगेड आणि पश्चिम लडाखच्या उच्च उंचीच्या भागात एक हिल डिव्हिजन आणि ईशान्येकडील एका कॉर्प्सचे नेतृत्व केले आहे.

मनोज पांडे हे नागपूरचे प्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ. सी.डी. पांडे आणि आकाशवाणीच्या उद्घोषिका प्रेमा पांडे यांचे ज्येष्ठ पुत्र आहेत. पांडे कुटुंबीय अमरावती रोडवरील हिंदुस्थान कॉलनी येथे वास्तव्यास आहेत. मनोज पांडे यांचा एकुलता एक मुलगा अक्षय पांडे भारतीय वायुसेनेत कमिशन्ड ऑफिसर असून त्यांची नेमणूक बंगळुरू येथे आहे. लेफ्टनन्ट जनरल मनोज पांडे यांच्या पत्नी अर्चना पांडे दंत चिकित्सक आहेत. मनोज पांडे यांना हार्दिक शुभेच्छा!

**क्लिक...क्लिक...!** (छाया : सुधीर नाझरे)




**मुरुड : मुरूड शहर व एकदरा गावाला जोडणारा एकदरा पूल कोळी बांधवांच्या मासेमारी जाळ्यांनी सजला आहे. मुरूड किनारी प्रशस्त जेटी नसल्याने जाळी सुकवणे, मासे सुकवणे यासाठी जागा नाही. म्हणून कोळी बांधव जाळी पुलावर सुकत घालत आहेत.**

## आरोग्य प्रहर

# हृदयाच्या आरोग्यासाठी निद्रानाश टाळा!

निद्रानाशामुळे हृदयावर ताण येऊन हृदयविकाराचा धोका वाढतो. या संदर्भात 'स्लीप ॲडव्हान्सेस' या संशोधन पत्रिकेत एका अभ्यासाची निरीक्षणे देण्यात आली आहेत. सरासरी ६२ वर्षांपर्यंतच्या एक हजार व्यक्तींचा अभ्यास या संदर्भात करण्यात आला. ज्यांना गेल्या १६ महिन्यांत हृदयविकाराचा झटका आला आहे अथवा हृदय वाहिन्यांतील अडथळे काढण्याची शस्त्रक्रिया झाली आहे, अशांचा यात समावेश केला गेला. त्यांच्याकडून भरून घेतलेल्या प्रश्नावलीतून त्यांच्या झोपेच्या सवयी जाणून घेण्यात आल्या. पूर्वी झालेल्या त्रासांविषयीही जाणून घेण्यात आले. त्यांचे चार वर्षे निरीक्षण करण्यात आले. या काळात यापैकी कुणाला पक्षाघात, हृदयविकाराचा झटका अथवा हृदयविकाराने मृत्यू झाल्यास तशा नोंदी ठेवण्यात आल्या.

या अभ्यासानुसार या व्यक्तींपैकी जवळपास निम्म्या व्यक्तींना निद्रानाशाचा त्रास होता. त्यातील २४ टक्के व्यक्ती झोपेची औषधे घेत होती. पाठपुराव्याच्या काळात २२५ व्यक्तींना ३६४ वेळा हृदयविकाराचा मोठा त्रास सहन करावा लागला. जर यापैकी कुणालाही निद्रानाशाचा विकार नसता तर १६ टक्के व्यक्तींना हृदयविकाराचा त्रास झाला नसता, असा या अभ्यासाचा निष्कर्ष निघाला. घोरण्याच्या सवयीने, तसेच झोपेत श्वासनलिकेत अडथळे येऊन अत्यल्प काळासाठी श्वास थांबल्याने झोप खंडित होते. याला 'स्लीप ॲप्निया' म्हणतात. त्यामुळेही निद्रानाशाचा विकार जडून हृदयविकाराचा धोका संभवतो. त्यावर वैद्यकीय सल्ल्यानुसार उपचार करता येतो. आपल्या आरोग्यासाठी पुरेशी झोप आवश्यक असते, असे स्पष्ट करून तज्ज्ञ सांगतात, की त्यामुळे आपल्या शरीर आणि मनाला पुरेसा आराम मिळतो.



गाढ झोपेत आपला रक्तदाब जागे असतानाच्या तुलनेत १० टक्क्यांनी कमी होतो. पुरेशा झोपेअभावी रक्तदाब घटत नाही. असे सातत्याने घडल्याने हृदयावर ताण येतो. निद्रानाश टाळण्यासाठी निद्रेसंबंधीच्या योग्य सवयी लावणे गरजेचे आहे. झोपेआधी काही काळ मोबाइल, टीव्ही किंवा इतर इलेक्ट्रॉनिक, संगणकीय वापर थांबवावा. लवकर निजणे आणि लवकर उठणे गरजेचे आहे. दिवसा झोप घेणे टाळावे. मद्य, कॉफी-चहा झोपेआधी टाळावा. नियमित व्यायाम करणे गरजेचे आहे. या उपायांनीही जर निद्रानाश जात नसेल, तर वैद्यकीय सल्ला घ्यावा.

# कालव्याला पाणी सोडा; अन्यथा आंदोलन!

## रोहा पाटबंधारे विभागाच्या कारभाराविरोधात भाजप आक्रमक

### अमित घाग यांचा इशारा



(छाया : जितेंद्र जाधव)

**धाटाव : प्रतिनिधी**

कोलाड ते भुवनेश्वर आणि कोलाड ते पडम या डाव्या, उजव्या कालव्यांना त्वरीत पाणी सोडण्यात यावे, अशी मागणी भारतीय जनता पक्षाच्या वतीने रोहा पाटबंधारे विभागाकडे सोमवारी (दि. १८) निवेदनाद्वारे करण्यात आली. शेती आणि पिण्यासाठी या दोन्ही कालव्यांना तातडीने पाणी सोडले नाही तर जनतेच्या रोषाला सामोरे जाण्याची तयारी ठेवा, असा इशारा भाजप युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अमित घाग यांनी या वेळी पाटबंधारे विभागाला दिला.

भाजप युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अमित घाग यांनी सोमवारी पाटबंधारे विभागाचे रोहा येथील उप अभियंता अतुल आगवणे यांची त्यांच्या कार्यालयात भेट घेऊन त्यांना मागण्यांचे निवेदन दिले. या वेळी युवा मोर्चाचे रोहा तालुका अध्यक्ष राजेश डाके, कामगार आघाडीचे अध्यक्ष विलास डाके, ज्येष्ठ नेते तारु शेट यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

प्रामुख्याने सिंचन व पिण्यासाठी कोलाड ते भुवनेश्वर आणि कोलाड ते पडम या कालवे काढण्यात आहेत. गेल्या काही वर्षापासून सिंचनाकरिता पाणी सोडण्यात येत नाहीत मात्र कालव्यांच्या साफसफाई करिता खर्च करण्यात येत आहे, असे अमित घाग यांनी या वेळी निदर्शनास आणून दिले.

या कालव्यांच्या तीरावर असणाऱ्या नागरिकांना व शेतकऱ्यांना सध्या मोठ्या प्रमाणावर पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे.

काही गावांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागत आहे. मुक्या जनावरांनादेखील पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे. ही परिस्थिती लक्षात घेऊन पाटबंधारे विभागाने कोलाड ते भुवनेश्वर आणि कोलाड ते पडम या डाव्या आणि उजव्या कालव्यांना पाणी सोडण्यात यावे, असे भाजपतर्फे सोमवारी रोहा पाटबंधारे विभागाला दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

पाटबंधारे विभागाने या कालव्यांना पाणी सोडण्याचा निर्णय घेतला नाही तर आंदोलन करण्याचा इशारा युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष अमित घाग यांनी या वेळी रोहा पाटबंधारे विभागाला दिला.

**भाजपच्या वतीने देण्यात आलेल्या निवेदनाची प्रत आमचे वरिष्ठ अधिकारी राकेश धावडे त्यांना तातडीने पाठवण्यात येईल तसेच संबंधित उपविभागांनाही कळविण्यात येईल.**
**–अतुल आगवणे, उपअभियंता, रोहा पाटबंधारे विभाग**

## खालापूर शहरातील मुख्य रस्त्याची दूरवस्था

**खोपोली : प्रतिनिधी**

शहरातील मुख्य रस्त्याच्या झालेल्या दूरवस्थेमुळे पायी चालणेदेखील अवघड बनले असून, या प्रश्नावर सर्व राजकीय पक्ष मूग गिळून असल्याने सार्वजनिक बांधकाम विभाग अधिकारी सुस्त झाले आहेत.

खालापूर शहरातून जाणारा मुख्य रस्ता जुना मुंबई–पुणे महामार्ग आणि वणवे–निंबोडे मार्गे सावरोली–खारपाडा राज्यमार्गाला जोडला गेला आहे. खालापूर शिरवलीवाडी ते वणवे गाव या रस्त्याचे डांबरीकरण गेल्यावर्षी पूर्ण झाले होते. यंदा पावसाळा संपल्यानंतर दांडवाडी ते निंबोडे गाव या रस्त्याचे डांबरीकरण पूर्ण झाले आहे. मात्र या रस्त्याचा खालापूर छत्रपती शिवाजी चौक ते घोडवली फाटा हा अर्धा किलोमीटर लांबीचा टप्पा अपूर्ण राहिला आहे. त्यामुळे या अर्धा किमी. रस्त्यावर जागोजागी खड्डे पडले आहेत. कायम वर्दळीचा हा रस्ता असून, न्यायालयाची इमारत याच मार्गावर आहे. उर्वरित रस्त्यासाठी निधी उपलब्ध होईल, तेव्हा होईल रस्त्यावर पडलेले खड्डे तरी सार्वजनिक बांधकाम विभागाने बुजवावेत, अशी मागणी खालापूरच्या दिलासा फाउंडेशनने अभियंता प्रशांत राखाडे यांच्याकडे केली होती. त्यावेळी शिल्लक रस्त्यासाठी प्रस्ताव पाठवला आहे. मंजुरी मिळताच काम करण्यात येईल असे उत्तर दिले होते.

दरम्यान, खालापूर छत्रपती शिवाजी चौक ते घोडवली फाटा या रस्त्याची तातडीने दुरूस्ती करावी, अशी मागणी खालापूरमधील नागरिक करीत आहेत.



(छाया : विनायक माडप)

## बोरघाटातील दरीत ट्रक कोसळताना बचावला

**खोपोली : प्रतिनिधी**

मुबंई–पुणे एक्सप्रेस वेवर सोमवारी (दि. १८) रात्री अंडा पॉईंटजवळ एका ट्रकचा ब्रेक निकामी झाल्याने तो समोरील दगडांवर आदळून तो रस्त्याच्या कडेला जाऊन थांबला. सुदैवाने तो दरीत कोसळताना बालंबाल बचावला.

मुबंई–पुणे जुन्या महामार्गावर अपघाताची मालिका सतत सुरूच आहे. सोमवारी रात्री एक बोरघाटातून लोणावळाकडून खोपोलीकडे येत होता. अंडा पॉईंटजवळील तीव्र उतारावर त्याचा ब्रेक निकामी झाल्याने तो समोरील दगडावर जाऊन आदळला, परंतु पुढे तो महामार्गाच्या कडेला असलेल्या दगडामुळे थांबल्याने बोरघाटातील दरीत कोसळता कोसळता वाचला.

(छाया : सलीम शेख)




## कोमसाप तळा शाखेचा वर्धापन दिन उत्साहात

**माणगाव : प्रतिनिधी**

कोकण मराठी साहित्य परिषद (कोमसाप)तळा शाखेचा सातवा वर्धापन दिन सोमवारी (दि. १८) इंदापूर येथील एस. एस. निकम इंग्लिश स्कूलमध्ये उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी मान्यवर कविंनी आपल्या कविता सादर केल्या.

कोमसापचे तळा शाखा अध्यक्ष हेमंत बारटक्के यांनी प्रास्ताविकात मागील सात वर्षात राबविलेल्या उपक्रमांचा आढावा घेतला. आणि कवी दत्ता हलसगीकर यांची 'ज्यांची बाग फुलून आली' ही रचना सादर केली.

कवी–साहित्यिकाने नेहमी अन्यायाविरुद्ध उभे राहून आपल्या कविता व साहित्यातून न्याय्य बाजू समाजापुढे मांडली पाहिजे, असे प्रतिपादन नायब तहसीलदार संजय माने यांनी केले. कोमसापच्या माणगाव शाखेचे अध्यक्ष अजित शेडगे, जिल्हा समन्वयक अ. वि. जंगम यांनी मनोगत व्यक्त केले.

तळा पंचायत समिती गटशिक्षणाधिकारी सुरेखा तांबट, स्वप्नाली शेठ, विशाखा जोशी, धोत्रे गुरुजी, उल्का माडेकर, संदेश शिंदे, बाळकृष्ण मेहता, संदीप जामकर, शिल्पा मोहिते, परमानंद कजबजे, पत्रकार रामजी कदम, अ. वि. जंगम, अजित शेडगे, भरत जोशी, सुरेखा तांबट, माधुरी मेहता, वंदन सापळे, यशवंत मोंडे यांनी या वेळी सुप्रसिद्ध कविंच्या रचना सादर रसिकांना तृप्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रणय इंगळे यांनी केले. कोमसाप तळा शाखेचे संस्थापक पुरुषोत्तम मुळे यांनी आभार मानले.

## रोहा तालुक्यातील जि. प.च्या १८ शाळांत सेमी इंग्रजी वर्ग सुरू होणार

**रोहे : प्रतिनिधी**

जिल्हा परिषद शाळांकडे पालकांना आकर्षित करण्यासाठी येत्या शैक्षणिक वर्षापासून रायगड जिल्ह्यात २८८ सेमी इंग्रजी शाळा सुरू करण्यात येणार असून त्यात रोहा तालुक्यातील १८ प्राथमिक शाळांचा समावेश आहे.

अवास्तव फीमुळे ग्रामीण भागातील पालकांना आपल्या मुलाला खाजगी इंग्रजी शाळेत पाठविणे परवडत नाही. ती मुले या शिक्षणापासून वंचित रहात आहेत. पालकांना जिल्हा परिषद शाळांकडे आकर्षित करण्यासाठी शासनाने जि. प प्राथमिक शाळांत सेमी इंग्रजीचे वर्ग सुरु करण्याचे ठरविले आहे. त्यानुसार जिल्ह्यातील २८८ शाळांत २०२२–२३ या शैक्षणिक वर्षापासून सेमी इंग्रजी शिक्षण सुरु होणार आहे. प्रत्येक केंद्र स्तरावरील एक या प्रमाणे रोहा तालुक्यातील १८ जि. प. शाळांमध्ये सेमी इंग्रजी शिक्षण सुरू होणार आहे. त्यासाठी शाळा मुख्याध्यापकाचा प्रस्ताव, स्थानिक शाळा व्यवस्थापन समितीचा ठराव, पालकांचे संमतीपत्र आवश्यक आहे. त्याचे नियोजन करण्यासाठी तालुका पंचायत समिती शिक्षण विभागाच्या बैठका सुरू आहेत.

सेमी इंग्रजी शिक्षण चालू होत असताना शिक्षकांचा प्रश्न मात्र निर्माण होणार आहे. आधीच तालुक्यात शिक्षण विभागात अधिकारी वगळता मुख्याध्यापकासह ९३ जागा रिक्त आहेत. सेमी इंग्रजी शिक्षणसाठी इंग्रजीतून डिएड झालेल्या शिक्षकांची आवश्यकता आहे.

## वावे निजामपुरात शाळापूर्व तयारी मेळावा

**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील वावे निजामपूर शाळेत नुकताच शाळापूर्व तयारी मेळावा घेण्यात आला. या वेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीही उत्साहात साजरी करण्यात आली.

सुरुवातीला गावात प्रभातफेरी काढण्यात आली होती. शाळेतील विद्यार्थी, शिक्षक, पालक, महिला मंडळ प्रतिनिधी, ग्रामस्थ या प्रभातफेरीत सहभागी झाले होते. चंद्रकांत जाईलकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या शाळापूर्व तयारी मेळाव्याच्या सुरुवातीस मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवराय व डॉ. बाबासाहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आले. मोहिते सर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. या वेळी २०२२–२३ या शैक्षणिक वर्षात दाखल होणाऱ्या भक्ती प्रदीप मारणे आणि निल नितीन चांदोरकर या विद्यार्थ्यांचे केंद्रप्रमुख पाटील यांनी पुष्पगुच्छ तसेच खाऊ देऊन स्वागत केले व आपले मनोगत व्यक्त केले. केंद्रप्रमुख पंकज शिर्के, शाळा व्यवस्थापन कमिटी अध्यक्ष प्रकाश सालदूर, उपाध्यक्ष सुप्रिया शिर्के, गोरख भोरावकर, अंगणवाडी ताई निर्मला भोरावकर, माजी विद्यार्थी समीर शिर्के, संकेत मारणे यांच्यासह पालक, महिला इत्यादी उपस्थित होते.उपस्थित सर्व पालकांनी स्टॉलला भेटी दिल्या तसेच मुलांना प्रश्न विचारून त्यांच्या कलागुणांना प्रेरणा दिल्या.

मुख्याध्यापिका सायली वाटवे, शिल्पा मारणे, नंदिनी मारणे, अर्चना शिर्के, शाळा व्यवस्थापन कमिटी सदस्य आणि महिला सदस्यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

## अलिबागच्या पांढऱ्या कांद्याची यंदा निर्यात नाही!

**अलिबाग : प्रतिनिधी**



भौगोलिक मानांकन प्राप्त झाल्याने अलिबागच्या पांढऱ्या कांद्याच्या निर्यातीसाठी प्रयत्न सुरु झाले होते, मात्र या वर्षी उत्पादन कमी असल्याने अलिबागच्या पांढ्या कांद्याची निर्यात होऊ शकली नाही.

रायगड जिल्ह्यात खरीप हंगामात भात पिकाची मोठ्या प्रमाणात लागवड होत असते मात्र रब्बी हंगामात सिंचन क्षेत्र वगळता फारशी पिकं घेतली जात नाहीत. रायगड जिल्ह्यात ओलिताखालील क्षेत्र फारसे नसल्याने दुबार आणि तिबार शेती जवळपास केली जात नाही. गेल्या काही वर्षात ही परिस्थिती बदलण्यास सुरवात झाली आहे. भात कापणी नंतर जमिनीतील ओलावा दोन महिने टिकत असल्याने पांढराकांदा यासारख्या पिकांची लागवड करण्यास सुरुवात झाली आहे.

पांढऱ्या कांद्याचे उत्पादन अलिबाग तालुक्यातील प्रामुख्याने नेहुली, खंडाळे, कार्ले, तळवली या गावांमध्ये घेतले जाते. आलिबाग तालुक्यातील इतरही गावांमध्ये पांढऱ्या कांद्याची लागवड शेतकरी करू लागले आहेत.

या कांद्याला वाढती मागणी आणि चांगली किमंत मिळत असल्याने गेल्या काही वर्षात लगतच्या गावात पांढऱ्या कांद्याची लागवड केली जाऊ लागली. मागील वर्षी २३० हेक्टरवर पांढऱ्या कांद्याची लागवड करण्यात आली होती. यावर्षी पांढऱ्या कांद्याच्या लागवडीचे क्षेत्र काही प्रमाणात घटले आहे. यंदा केवळ अलिबाग तालुक्यात २२७ हेक्टर क्षेत्रावर पांढऱ्या कांद्याची लागवड करण्यात आली आहे. अवकाळी पावसाचाही काही प्रमाणात कांदा लागवडीवर परिणाम झाला आहे. रोप कुजल्याने लागवडी खालील क्षेत्र घटले आहे. पांढऱ्या कांद्याचा आकार मोठा असल्याने कांद्याला चांगला दरही मिळत आहे. अगदी सुरवातीला ३५० रुपये दराने कांद्याची माळ विकली गेली. बाजारात आवक वाढल्याने आता लहान कांदा १५० ते २०० रुपये माळ तर मोठा कांदा २५० ते २८० रुपये प्रती माळ दराने पांढरा कांदा विकला जात आहे.

रुचकर चव आणि औषधी गुणधर्म असलेल्या अलिबागच्या पांढऱ्या कांद्याला गेल्या वर्षी भौगोलिक मानांकन प्राप्त झाले आहे. त्यामुळे या कांद्याला असणारी मागणी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. मात्र यावर्षी उत्पादन वाढलेले नाही. त्यामुळे पांढऱ्या कांद्याची निर्यात मात्र होऊ शकली नाही. या कांद्याचे उत्पादन प्रामुख्याने संेद्रीय पध्दतीने घेतले जाते. रासायनिक खतांचा आणि किटकनाशकांचा वापर केला जात नाही. भौगोलिक मानांकन प्राप्त झाल्यामुळे अलिबागच्या पांढऱ्या कांद्याला आंतराष्ट्रीय बाजारात चांगली किंमत मिळू शकते. त्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

**कांद्याच्या निर्यातीसाठी प्रयत्न सुरु झाले आहे. त्यासाठी कृषीविभागा मार्फत शेतकऱ्यांना प्रोत्साहन दिले जात आहे. यावर्षी उत्पादन कमी असल्याने निर्यात होऊ शकली नसली तरी पुढील वर्षी या कांद्याची निर्यात करण्याचे उद्दीष्ट असणार.**
**–दत्तात्रय काळभोर, कृषी उपसंचालक, अलिबाग, रायगड**

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**Extension to E –TENDER NOTICE**

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification. Tender fees Rs.500/- + GST**

| S.N. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No.: 7000022562** **Tender No. : EE/EHV (O&M)/DN/PNL/Re-e-Tender-18/2022-2023** Extension Rfx Re-e-tender to work of Providing and Fixing of Marshalling Box for Fan and Pump Control of 200 MVA ICT-4 at 220kV Apta, 50 MVA TF at 220kV ONGC PNL, 50 MVA TF at 100kV Khopoli Substation under EHV (O&M) Division Panvel. **Tender amount Rs. 14,76,181/-, EMD amount Rs. 14,762/-** |
| 2 | Online Downloading the RFx . | **19.04.2022, 17:00 Hrs. to 26.04.2022, 11:00Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 26.04.2022 up to 11:00 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **27.04.2022 at 11:05 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**SD/-**
**(M.C. JOSHI)**
**EXECUTIVE ENGINEER**
**EHV(O&M) DN. PANVEL**

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**Re-E –TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification.

| Sr.No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFxNo: -7000022791** **Tender No. : EE/EHV (O&M)/DN/PNL/ Re-e-Tender-21/2022-2023** RFx Re-e-tender for work of tree cutting work of various 100kV & 220kV Lines under EHV Lines S/Dn Panvel under EHV(O&M) Division Panvel. **Tender amount Limited to Rs. 11,55,009/-, EMD amount Rs. 11,550/-.** |
| 2 | Online Downloading the RFx | **18.04.2022, 18:00 Hrs. to 25.04.2022, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 25.04.2022 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **26.04.2022 at 11:00 hrs.(if Possible)** |

Tender fees Rs. 500/- + GST
For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

SD/-
**(M. C. JOSHI)**
**EXECUTIVE ENGINEER**
**EHV(O&M) DN PANVEL**

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**अलिबाग सा.बां. विभाग, अलिबाग**
**पिन कोड – ४०२ २०१**

ई–मेल पत्ता :– alibag.ee@mahapwd.com    दूरध्वनी/फॅक्स क्रमांक :–(०२१४१) २२२०८४/२२५०९६

**ई-निविदा सूचना क्र. ०३ सन २०२२-२०२३**

कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकरीता सक्षम कंत्राटदारांकडून (जे निविदेत असलेल्या अटी व शर्ती पूर्ण करतील असे कंत्राटदार) ब–१ नमुन्यातील ई–निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित किंमत रुपये |
|---|---|---|
| १ | पोयनाड ऊसर भादाणे नागांव आक्षी बेलकडे रस्त्याची सुधारणा करणे. रा.मा.९० कि.मी. ०/०० ते ५/०० आणि १४/०० ते १५/०० ता. अलिबाग, जि. रायगड | २,९१,५१,७२०.००/– |

ई–निविदा उपलब्ध कालावधी :– दिनांक २०/०४/२०२२ (स.१०.००) ते दिनांक ०४/०५/२०२२ (सं.१८.००)
निविदापूर्व बैठक :– मा. मुख्य अभियंता, सा.बां. प्रादेशिक विभाग, कोकण मर्झबान रोड, मुंबई यांचे दालनात दिनांक २६/०४/२०२२ रोजी दु. ३.०० वा.
ई–निविदा उघडणे :– दिनांक ०९/०५/२०२२ (दु. ३.०० वा.) (अधीक्षक अभियंता, सा.बां. रायगड, कोकणभवन, नवी मुंबई यांचे कार्यालयात)

खालील संकेतस्थळावर ई–निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
१. http://mahapwd.com
२. http://mahatenders.gov.in
(सदर निविदे सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)
३. कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग कार्यालयातील सूचना फलक.

**जा.क्र./सा.बां./अवि/निविदा/२३७४/२०२२**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**सा.बां. विभाग, अलिबाग – ४०२ २०१**
**दिनांक :– ११/०४/२०२२**

**सही/–**
**(जे. ई. सुखदेवे)**
**कार्यकारी अभियंता,**
**सा.बां.विभाग, अलिबाग,**
**जि. रायगड**

# अग्निशमन केंद्राच्या ठिकाणी होणार आपत्कालीन कक्ष

## पावसाळ्यासंबंधीची कामे १५ मेपूर्वी पूर्ण करा; नवी मुंबई आयुक्तांचे निर्देश

**नवी मुंबई : बातमीदार**

महापालिका मुख्यालयात वर्षभर, अहोरात्र सुरू असणाऱ्या प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन केंद्राप्रमाणेच पावसाळ्यात बेलापूर, नेरूळ, वाशी, ऐरोली येथील अग्निशमन केंद्रांच्या ठिकाणी २५ मेपासून आपत्कालीन नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात येणार आहेत, तसेच आठही महापालिका विभाग कार्यालयात विभागीय नियंत्रण कक्ष सुरू करून या सर्व ठिकाणी आवश्यक साधनसामुग्री व उपकरणांसह मदत करण्यासाठी पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध ठेवण्याचा निर्णय पालिकेने घेतला आहे. पावसाळापूर्व कामांविषयक घेतलेल्या बैठकीत आयुक्तांनी १५ मेपर्यंत कामे पूर्ण करण्याचे निर्देश दिले.



नवी मुंबई पालिकेची पावसाळापूर्व कामांविषयक बैठक मंगळवारी (दि. १९) झाली. या बैठकीत विविध महत्त्वाच्या विषयांवर चर्चा करण्यात आली. बैठकीला अतिरिक्त आयुक्त सुजाता ढोले व संजय काकडे तसेच इतर सर्व प्राधिकारणांचे अधिकारी होते.

अग्निशमन विभागाकडे असलेल्या रबर बोटी, पाणीउपसा पंप तसेच इतर साहित्य व उपकरणे कार्यान्वित असल्याबाबत तपासणी करून घ्यावी, असेही निर्देश देण्यात आले आहेत. आपत्ती नियंत्रण कक्षातील दूरध्वनी कोणत्याही परिस्थितीत अनुत्तरित राहणार नाही याची काळजी घेतानाच, एखादी तक्रार प्राप्त झाल्यानंतर त्याचे त्वरित निराकरण झाले पाहिजे याकडे काटेकोर लक्ष देण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले आहेत.

स्थापत्यविषयक कामे २४ तास सुरू ठेवावीत. रस्ते खड्डेमुक्त करावेत. दिवाबत्ती व्यवस्थित ठेवावी. पाणी साचू नये यासाठी महानगरपालिकेप्रमाणेच सार्वजनिक बांधकाम विभाग व एमआयडीसीने रस्त्यावर पडलेले डेब्रिज उचलावे. बंदिस्त नाले व नैसर्गिक नाल्यांची सफाई विहित वेळेत पूर्ण करावी. दुर्गम भागात नळाद्वारे पाणीपुरवठा होत नाही, तेथील पाणी नमुन्यांची नियमित तपासणी करावी. मलनि:स्सारण वाहिन्यांची झाकणे दुरूस्त करावीत. भरतीच्या काळात गटारांवरील झाकणे बॅकवॉटरमुळे उघडली जाणार नाहीत याची काळजी घ्यावी. याशिवाय जनरेटर बॅकअप ठेवावा.

### आपत्कालीन निवाऱ्याची योग्य सोय करावी

दरड, माती कोसळण्याची संभाव्य ठिकाणे, नैसर्गिक नाल्यांची ठिकाणे येथील नागरिकांना स्थलांतरीत करण्यासाठी दक्षता घ्यावी. आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांच्या निवाऱ्याकरीता शाळा व समाजमंदिरांचे विभाग कार्यालयांनी पूर्वनियोजन करावे. आवश्यक अन्नधान्य साठा करून ठेवावा, अशा सूचना करण्यात आल्या.

वाहतूक पोलीस विभागामार्फत सिग्नल यंत्रणा नियमित कार्यान्वित राहिल याकडे लक्ष द्यावे. तसेच स्पीडब्रेकर, झेब्रा क्रॉसिंगच्या रंगरंगोटीचीही कामे आपापल्या अखत्यारितील रस्त्यांवर करून घ्यावीत. महावितरण कंपनीने उघड्या केबल, डिपीची झाकणे बंद असण्याची खबरदारी घ्यावी व दुरूस्ती करून घ्यावी.

धोकादायक इमारतींची यादी तयार करून ती जाहीर करण्यात यावी. परवाना विभागानेही धोकादायक होर्डींगची पाहणी करून दुरुस्ती करावी. पावसाळी कालावधीतील संभाव्य आजार लक्षात घेता आवश्यक औषधसाठा उपलब्ध करून ठेवावा. डास उत्पत्तीस्थाने आढळणाऱ्या ठिकाणी दंडात्मक कारवाई करण्याचे निर्देश आरोग्य विभागाला देण्यात आले. झाडांच्या फांद्यांची आवश्यक तेवढ्याच प्रमाणात छाटणी करावी. हरित कचरा त्वरित उचलण्यासाठी उद्यान व स्वच्छता विभागांनी परस्पर समन्वय राखावा, अशा सूचना करण्यात आल्या आहेत.

# गांजा विक्रीप्रकरणी तिघांना अटक

## सानपाडा, नेरूळ, खारघर येथे कारवाई

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

सानपाडा, नेरूळ, खारघर भागात अवैधरित्या अमली पदार्थ विक्री करणाऱ्यांवर कारवाई करण्यात आली.

सानपाडा उड्डाणपुलाखाली एक जण गांजा विकण्यास येणार असल्याची माहिती मिळाल्यावर त्या ठिकाणी सापळा रचण्यात आला. यात आरोपी हा उड्डाणपुलाखालील चौकात एका मिठाईच्या दुकानासमोर उभा असताना पोलिसांनी त्याला पकडून झडती घेतली असता त्याच्याकडे पाच किलो ५०० ग्रॅम वाजनाचा गांजा आढळला. गांजा, त्याचा मोबाइल आणि कारसह तीन लाख ४२ हजारांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे.

दुसरी कारवाई नेरूळ पोलीस ठाणे हद्दीत असलेल्या बालाजी झोपडपट्टी परिसरात करण्यात आली. पाइपलाइन शेजारी राहणारी महिला ही घरातूनच गांजा विक्री करीत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारावर वपोनि. बशीर सय्यद यांनी महिला पथक पाठवून तिला ताब्यात घेत झडती घेतली. तिच्याकडे ८१० ग्राम वजनाचा गांजा आढळून आला. हा १६ हजार २०० रुपयांचा गांजा आणि २५० ची रोख रक्कम असा ऐवज जप्त करण्यात आला आहे.

तिसऱ्या कारवाईत खारघर येथे बेलपाडा गावात एका महिलेकडेही १५ हजार १०० रुपयांचा गांजा आढळला. या तिन्ही कारवाईत मिळून तीन लाख ७३ हजार ५५० रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे, अशी माहिती पोलीस आयक्त बिपिनकुमार सिंह यांनी दिली.

# नवी मुंबईतील ४७५ इमारती धोकादायक घोषित

## ताबा सोडण्याचे रहिवाशांना आवाहन

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रामधील धोकादायक इमारतींचे सन २०२१-२२ या वर्षासाठी सर्वेक्षण करण्यात आले. सर्वेक्षणानंतर महानगरपालिका क्षेत्रात एकूण ४७५ इमारती धोकादायक म्हणून घोषित करण्यात आल्या आहेत.

ज्या इमारतींचा वापर सुरू होऊन ३० वर्षांपेक्षा अधिक काळ लोटला आहे, अशा इमारतींची नवी मुंबई महानगरपालिकेकडे नोंदणी केलेल्या बांधकाम अभियंत्याकडून किंवा संरचना अभियंत्याकडून संरचना परिक्षण करून घेणे अनिवार्य आहे.



(संग्रहित छायाचित्र)

३० वर्षांपेक्षा जास्त काळ इमारतीचा वापर किंवा इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र (पूर्ण अथवा अंशत:) क्षेत्रफळ वापराखाली आणले गेले अशा दिवसापासून मोजवयाचा आहे. नेमलेल्या संरचना अभियंत्याने शिफारशी केलेली दुरूस्तीची कामे पूर्ण झाल्याचे व ते बांधकाम सुस्थितीत असल्याचे प्रमाणपत्र नवी मुंबई महानगरपालिकेकडे सादर करावे. या प्रकारे संरचना परिक्षण करण्याचे उत्तरदायित्व जी संस्था, मालक, भोगवटादार पार पाडण्यास टाळाटाळ करतील त्यांना २५ हजार रूपये अथवा त्या मिळकतीचे वार्षिक मालमत्ताकराची रक्कम यातील जी जास्त असेल तितक्या रक्कमेचा दंड ठोठावयाची तरतूद करण्यात आली आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेने संरचनात्मक परिक्षक (स्ट्रक्चरल इंजिनियर) यांची यादी नवी मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिलेली आहे. ३० वर्षांपेक्षा जास्त काळ झालेल्या इमारतीचे संरचनात्मक परिक्षण ३० सप्टेंबर २०२२ पूर्वी पूर्ण करून याबाबतचा अहवाल संबधित विभागाचे सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी आणि सहाय्यक संचालक नगररचना, नवी मुंबई महानगरपालिका यांचेकडे सादर करायचा आहे.

धोकादायक झालेल्या इमारतींचा, घरांचा वापर करणे जीकिरीचे आहे. त्यामुळे जीवित व वित्तहानी होऊ शकते, म्हणून नागरिकांकडून धोकादायक इमारतींचा, घराचा वापर तत्काळ थांबविण्यात यावा, असे आवाहन पालिकेने केले आहे.



पनवेल : रायगड जिल्हा खासगी प्राथमिक कर्मचारी संघटनेकडून संघटनेसाठी मोलाची कामगिरी केल्याबद्दल व विस्मृतीत झालेल्या गडकिल्ल्यांची माहिती चित्रिकरणाच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहचविल्याबद्दल चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालयाच्या मराठी प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सुभाष गणपत मानकर यांना कळंबोली सुधागड हायस्कूल येथे रविवारी झालेल्या कार्यक्रमात संघटना भूषण गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमास माजी शिक्षण उपसंचालक व्ही. एस. म्हात्रे, माजी प्राचार्य के. डी. म्हात्रे आदी उपस्थित होते.

# कोकण विभागात ४,९१०पेक्षा अधिक एसटी कर्मचारी रूजू



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**


कोकण विभगातील ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि पालघर या चार जिल्ह्यांतील आगारांत मिळून चार हजार ९१०पेक्षा अधिक एसटी कर्मचारी कामावर रूजू झाले आहेत, तर ५० टक्क्यांहून अधिक एसटी वाहतूक सुरू झाली असल्याची माहिती एसटी महामंडळाने दिली.

२८ ऑक्टोबर २०२१पासून राज्यातील जवळपास ९२ हजार एसटी कर्मचाऱ्यांनी संप पुकारला होता. संपामुळे राज्यातील एसटी सेवा ठप्प झाली होती. ८ ते १८ एप्रिल या कालावधीत कोकण विभागाच्या ठाणे जिल्ह्यातील आगारांत एक हजार ४२५, रायगड जिल्ह्यातील आगारांत एक हजार ६४४, रत्नागिरी जिल्ह्यातील आगारांत एक हजार १२५ आणि पालघर जिल्ह्यातील आगारांत ७१६ कर्मचारी कामावर हजर झाले आहेत. कोकणात लवकरच १०० टक्के एसटी वाहतूक सुरु होईल, असे आगार प्रमुखांकडून सांगण्यात आले आहे.

# उकाडा वाढल्याने वीजवापरही वाढला

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महावितरणच्या पनवेल विभागात वाढत्या तापमानामुळे विजेच्या मागणीत तब्बल ४८ लाख युनिटची वाढ झाली आहे. फेब्रुवारीनंतर गारवा संपताच, वाढलेल्या उकाड्यामुळे हा वीज वापर वाढल्याचा अंदाज आहे.




पनवेल विभागात उरण, पनवेल शहर, खारघर, कळंबोली आणि भिंगारी उपविभागात एकूण चार लाख ५० हजार वीजग्राहक आहेत. सुमारे ९०० कारखाने असलेली मोठी एमआयडीसी, कळंबोली स्टील मार्केट, जेएनपीटी आदी मोठा वीजवापर असलेल्या भागात घरगुती वीजवापरदेखील अधिक आहे. यंदा हिवाळा लांबल्यामुळे विजेची मागणी फेब्रुवारीपर्यंत फार नव्हती. मात्र मार्चमध्ये उन्हाचा तडाखा सुरू झाल्यानंतर एसीचा वापर वाढल्यामुळे विजेच्या मागणीत वाढ झाली. पनवेल विभागात फेब्रुवारीत विजेचा एकूण वापर १७५.८९ लाख युनिट होता, मार्चमध्ये यात २७.३२ टक्क्यांची भर पडून २२३.९६ लाख युनिट वीज वापरली गेली.

उन्हाळ्याच्या दिवसांत घरे तसेच दुकानांमध्ये एसीचा वापर प्रचंड वाढल्यामुळेच वीज वापर वाढत असल्याचे महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे विजेवरील भार वाढून वीज खंडित होण्याच्या घटना याच कालावाधीत वाढतात. त्यामुळे वीज ग्राहकांनी विजेचा अनावश्यक वापर टाळण्याचा प्रयत्न करून महावितरणला सहकार्य करावे, असे आवाहन पनवेल विभागाचे कार्यकारी अभियंता सतीश सरोदे यांनी केले आहे.



पनवेल : अंगारक संकष्ट चतुर्थीनिमित्त मंगळवारी शहरातील ज्येष्ठराज गणपती मंदिरात भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. अंगारक योगनिमित्त गणपतीला खास आंब्यांचा नैवेद्य दाखविण्यात आला. (छाया : लक्ष्मण ठाकूर)



पनवेल : उन्हाचा पारा दिवसेंदिवस चढत असल्याने थंड राहण्यासाठी नागरिक विविध उपाय करीत आहेत. त्यातीलच एक म्हणजे कुल्फी! दुपाच्या कडक उन्हात कुल्फीचा थंडावा मनालाही शांतता मिळवून देतो.

# न्हावा गावदेवीची भव्य यात्रा मोठ्या जल्लोषात



**उरण : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्राला तिर्थक्षेत्रांची विशेष परंपरा लाभलेली आहे. या परंपरेनुसार विविध ठिकाणी जागृत देवस्थाने आहेत. त्यापैकी जेएनपीटी बंदर व घारापुरी (एलिफंटा लेणी) यांच्यामधील न्हावा नावाचे गाव आहे. न्हावा गावामधील मंदिर महाराष्ट्रात सुप्रसिद्ध आहे.

या गावातील गावदेवीची यात्रा १७ व १८ एप्रिलदरम्यान मोठ्या उत्साहात पार पडली. कोरोनानंतर प्रथमच धूमधडाक्यात व भक्तीपूर्ण वातावरणात सर्व भक्तांनी देवीचे मनोभावे दर्शन घेतले, तसेच पालखी सोहळा सोमवारी (दि. १८) भक्तीपूर्ण वातावरणात पार पडला. गावचे सुपुत्र रोशन घरत याने गावातील गीतकार, संगीतकार, नृत्य दिग्दर्शक कै. अनंताबुवा यांची सुंदर रंगावली रेखाटून त्यांच्या आठवणींना उजाळा दिला, तर वैभव कटावते यानेही महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज व देवीचे सुंदर शिल्प रेखाटून मानवंदना दिली.

सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे, न्हावा ग्रामसेवा मंडळाचे अध्यक्ष शैलेश पाटील, उपाध्यक्ष जयेंद्र पाटील, चेतन कडू, मोरेश्वर पाटील, खजिनदार गणेश भोईर, सहखजिनदार अनंत म्हात्रे, अक्षय ठाकूर, सुरेश म्हात्रे आदींसह इतर पदाधिकऱ्यांनी विशेष मेहनत घेतली. गावदेवीचे मंदिर ग्रामस्थांच्या सहकार्याने बांधण्यात आले आहे. ही देवी नवसाला पावते म्हणून अनेक भाविक येथे दर्शनाला येतात, अशी माहिती ग्रामस्थांनी दिली.

# एक्सेप्शनल अचिव्हमेंट ॲवॉर्डने तिघांचा सन्मान

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

संगीत, आरोग्य आणि अध्यात्म अशा त्रिवेणी संगमात काम करणारे डॉ. संतोष बोराडे, प्रितिश चौधरी व नरेंद्र भोईर या तिघांना एक्सेप्शनल अचिव्हमेंट ॲवॉर्ड २०२२ने सन्मानित करण्यात आले. रत्नधाव फाउंडेशन आयोजित दुबई येथील इंटरनेट सिटी येथे हा पुरस्कार सोहळा नुकताच पार पडला.

रत्नधाव फाउंडेशन, महालॅंड ग्रुप्स आणि सफिर कॉर्पोरेट सर्व्हिस प्रोव्हायडर एलएलसी यांच्या माध्यमातून डॉ. बबन जोगदंड यांच्या मार्गदर्शनाखाली या पुरस्काराचे आयोजन करण्यात आले होते. संगीत आणि आरोग्य क्षेत्रातून व्यापक समाजहिताचा विचार मांडणारे डॉ. संतोष बोराडे (कलोते), प्रितीश चौधरी (चौक) व नरेंद्र भोईर (लोधिवली) यांना त्यांच्या विशेष कामगिरीसाठी गौरवण्यात आले. आपल्या 'जीवनसंगीत' या कार्यक्रमाच्या माध्यमातून हे तिघे महाराष्ट्रासह हिंदी, कानडी, उडिया, गुजराती, पंजाबी, बंगाली अशा विविध भाषिक लोकांसमोर आनंदी जगण्याचा एक प्रभावी उपाय मांडत आहेत. भारतातील विविध राज्यांबरोबरच आता त्यांच्या कामाची दखल विदेशातही घेतली जात आहे. त्यांच्या पुढील वाटचालीसाठी विविध स्तरांतून शुभेच्छा देण्यात येत आहेत.



# नवीन पनवेलमध्ये आरोग्य तपासणी शिबिर

**पनवेल : वार्ताहर**

अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ सेवा व आध्यात्मिक विकास मार्ग दिंडोरीप्रणित शाखा पनवेलतर्फे नवीन पनवेलमधील हनुमान मंदिर, पोदी नं. ३, सेक्टर १६ येथे श्री स्वामी समर्थ पुण्यतिथीनिमित्त अखंड नामजप यज्ञ सप्ताहाचे नियोजन २२ ते २८ एप्रिलदरम्यान केले आहे. यानिमित्त २४ एप्रिल रोजी रक्तदान शिबिर व २६ एप्रिल रोजी सद्गुरू मोरेदादा चॅरिटेबल हॉस्पिटल ॲण्ड मेडिकल ट्रस्ट, त्र्यंबकेश्वर अंतर्गत मोफत आरोग्य तपासणी, नाडी परीक्षण आणि सर्व रोग निदान शिबिर सकाळी १० ते रात्री ८ या वेळेत आयोजित केले आहे.

सर्व नागरिकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त रसायनीत मिरवणूक



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती रसायनी परिसरात ठिकठिकाणी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. वंचित बहुजन आघाडीचे उपाध्यक्ष आशिष जाधव यांनी रविवारी (दि. १६) मिरवणुकीचे आयोजन केले होते.

या मिरवणुकीत विविध सामाजिक संघटनांसह मोठ्या संख्येने भीमसैनिक सहभागी झाले होते. सेबी रोड येथून मिरवणुकीची सुरुवात झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर की जय, भगवान बुद्धांचा विजय असो, छत्रपी शिवाजी महाराज की जय, अशा घोषणांनी परिसर दुमदुमला होता. नवीन पोसरी येथे निळ्या झेंड्याचे ध्वजारोहण आरपीआयचे शशी भालेराव यांच्या हस्ते झाले. मिरवणुकीत सहभागी झालेल्यांना शीतपेयाची व्यवस्था करण्यात आली होती. डॉ. आंबेडकर भवन येथे मिरवणुकीचा समारोप करण्यात आला.

# अदानी प्रकल्पाला शेतकऱ्यांचा विरोध

## अलिबागमधील जनसुनावणीत गदारोळ

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील शहाबाज-शहापूर येथे येऊ घातलेल्या अदानी प्रकल्पाची जनसुनावणी सोमवारी (दि. १८) प्रचंड गदारोळामध्ये पार पडली. या सुनावणीत शेतकरी आक्रमक झाले होते. शेतकऱ्यांनी या सुनावणीमध्ये अदानी प्रकल्पाला आपला तीव्र विरोध दर्शविला.

अदानी प्रकल्पाची जनसुनावणी ही पांडवादेवी येथील जयमंगल सभागृहात घेण्यात आली. जनसुनावणीसाठी अध्यक्ष म्हणून निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. पद्मश्री बैनाडे, उपविभागीय अधिकारी प्रशांत ढगे, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ रायगडचे प्रादेशिक अधिकारी व्ही. व्ही. किल्लेदार, उपप्रादेशिक अधिकारी राज कामत आदी अधिकारी व्यासपीठावर उपस्थित होते. जनसुनावणीमध्ये व्दारकानाथ पाटील, भारत बैकर, दर्शन जुईकर, प्रकाश धुमाळ, अनिल पाटील, डॉ. वैशाली पाटील, राजेंद्र पाटील, मंगेश भगत, निवास म्हात्रे, अमरनाथ पाटील, नंदकुमार पाटील आदींसह ग्रामस्थांनी आपली मत मंडली.

एकाच प्रकल्पाच्या दोन सुनावण्या घेण्यासाठी विरोध असताना प्रशासनाने या दोन सुनावण्या रेटून नेल्या. सायंकाळी उशिरापर्यंत या सुनावण्या सुरू होत्या. यावेळी शेतकऱ्यांनी रोजगार तसेच खारफुटी व पर्यावरणविषयक अनेक प्रश्न उपस्थित केले.

शहाबाज, शहापूर परिसरात यापूर्वीच पीएनपी, जेएसडब्ल्यू, सांघी सिमेंट अशा अनेक कंपन्या असून त्याचे दुष्परिणाम येथील जनता अद्याप भोगत असताना नवीन प्रकल्प कशाला आणता, असा प्रश्न या वेळी स्थानिक शेतकऱ्यांनी उपस्थित केला. धरमतर खाडीमध्ये प्रदूषणामुळे मत्स्योत्पादन कमी होऊन स्थानिक मच्छीमारांच्या समस्यांचा अभ्यास करण्यासाठी शासनाने नेमलेल्या नऊ सदस्यीय समितीचा अहवाल अद्याप आलेला नाही.

या प्रकल्पामुळे होणाऱ्या प्रदूषणाला स्थानिकांना तोंड द्यावे लागणार आहे, त्यामुळे त्यांच्या आरोग्यास धोका निर्माण होणार आहे. यासाठी काही स्थानिक शेतकऱ्यांनी या जनसुनावणीमध्ये अदानी प्रकल्पाला कडाडून विरोध दर्शविला.

भूमिपुत्रांचा विरोध जुगारून या जमिनीवर हा प्रकल्प भविष्यात उभा राहिलाच तर न्यायालयात धाव घेऊन या प्रकल्पाविरोधात लढा देऊ असा, इशाराही या वेळी देण्यात आला.





**अदानी प्रकल्पाने दाखविलेल्या जमिनीपैकी दोन सर्व्हे नंबर हे खाडीत (पाण्याखाली) असल्याचे सरकारी कागद दाखवून ही सुनावणी बोगस आहे, शेतकऱ्यांना फसविण्याचा उद्योग अधिकारीवर्ग करीत आहे. जनसुनावणीबाबत शेतकऱ्यांनी केलेल्या तक्रारींकडे दुर्लक्ष करून हा 'सरकारी फार्स' उरकण्यात आला.**
**-व्दारकानाथ पाटील, अध्यक्ष, शेतकरी संघर्ष समिती**

## मुंबई-गोवा चौपदरी महामार्गाला स्वराज्य राष्ट्रीय महामार्ग नाव द्यावे

### ▪ भाजप सरचिटणीस महेश शिंदे यांची मागणी

**महाड : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाचे काम अंतिम टप्प्यात असून, या महामार्गाला छत्रपती शिवाजी महाराज यांच्या 'स्वराज्य' राष्ट्रीय महामार्ग असे नामांतर करावे, अशी मागणी भाजपचे महाड तालुका सरचिटणीस महेश शिंदे यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांच्याकडे केली आहे.



कामाच्या अंतिम टप्प्यात असलेला मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ हा कोकणातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या गडकोट किल्ले, समुद्र दुर्ग आणि स्वराज्याची राजधानी किल्ले रायगडसह महाराजांच्या समाधीला वंदन करीत असून, या महामार्गाने प्रवास करणाऱ्या प्रत्येक प्रवाशाला स्वराज्याची महती समजावी यासाठी या महामार्गाचे 'स्वराज्य' राष्ट्रीय महामार्ग असे नामांतर करावे अशी मागणी भाजपचे महाड तालुका सरचिटणीस महेश शिंदे यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे. याच सोबत त्यांनी महाड-मढेघाट-वेल्हे-पाबेघाट-खानापूर मार्गे पुणे हा मार्ग पर्यटन महामार्ग म्हणून विकसित करावा, अशी मागणीदेखील केली आहे.

महाडमध्ये २२ जुलै २०२१ रोजी आलेल्या महापुराचे पाणी पहाता नव्याने रुंदीकरण व काँक्रीटीकरन होणाऱ्या महाड-रायगड मार्गाची उंची वाढणार आहे. लाडवली गावापासून नाते गावापर्यंत या मार्गावरील सिमेंट पाईप मोऱ्यांऐवजी स्लॅप ड्रेन व छोटे पुल बांधण्यात यावेत असेदेखील शिंदे यांनी यावेळी सुचविले.

या मागण्यांचा योग्य तो पाठपुरावा करण्याचे आश्वासन केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी दिले.

## मांडवा जेटी रस्त्यालगत आग; संभाव्य मोठी हानी टळली

**अलिबाग : प्रतिनिधी**

तालुक्यातील मांडवा जेटीजवळील रिलायन्स कंपनीच्या गॅस स्टेशननजीक सोमवारी (दि. १८) लागलेली आग त्वरित विझविण्यात थळ येथील आरसीएफ कंपनीच्या अग्निशमन दल जवानांना यश आल्याने संभाव्य मोठी हानी टाळता आली.



सोमवार दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास मांडवा जेटी रस्त्यालगत रिलायन्स कंपनीच्या गॅस स्टेशन जवळ मोठी आग लागल्याची सूचना आरसीएफ थळच्या अग्निशमन केंद्रास प्राप्त झाली. त्याचसोबत रिलायन्स, नागोठणे येथील जनसंपर्क अधिकारी रमेश धनावडे यांनी आरसीएफ जनसंपर्क विभागाकडे आरसीएफ थळच्या अग्निशमन दलाच्या मदतीसाठी दूरध्वनीवरून विनंती केली. घटनेची गांभीर्याने दखल घेत, आरसीएफ प्रशासनाने अग्निशमन बंब आणि कर्मचारी त्वरित रवाना केले. अवघ्या २० मिनिटात आरसीएफ थळचे अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले आणि वरिष्ठ अग्निशमन अधिकारी विष्णू गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली हनिफ कुरेशी, हरिश्चंद्र बावकर, तुषार कवळे, विशाल मंडलिक, अतुल ठाकूर या जवानांनी शर्थीचे प्रयत्न करून दोन-तीन एकर जमिनीवर पसरलेल्या आगीवर नियंत्रण मिळविले. दरम्यान, रिलायन्सचा बंब घटनास्थळी दाखल झाला आणि आग पूर्णत: विझविण्यात आली.



रिलायन्स कंपनीला गॅस पुरवठा करणाऱ्या पाइपलाईन्स आणि वाल्व स्टेशन जवळच असल्याने ही आग पसरू न देणे गरजेचे होते. आरसीएफ थळच्या अग्निशमन दल जवानांची तत्परता आणि शर्थीच्या प्रयत्नांमुळे मोठी दुर्घटना टळली.



## अलिबाग एसटी आगारातील २०० कर्मचारी कामावर हजर

**अलिबाग : प्रतिनिधी**

अंगारकी चतुर्थीचा योग साधत अलिबाग एसटी आगारातील सुमारे २०० कर्मचारी मंगळवारी (दि. १९) कामावर हजर झाले. सेवासमाप्ती झालेल्या १४ जणांनीदेखील पुन्हा सेवेत घेण्यासाठी अर्ज दिले आहेत.



मंगळवारी सकाळी साडेनऊ वाजता ठरल्याप्रमाणे एसटी कर्मचारी अलिबाग स्थानकात एकत्र जमले. जोरदार घोषणाबाजी केली. त्यानंतर सारेजण आगारातील गणपती मंदिरात पोहोचले. तेथे अंगारकीनिमित्त अभिषेक पूजाअर्चा झाली. महाआरतीनंतर सर्वजण कामावर हजर होण्यासाठी गेले.

कामकाजानुसार १०० कर्मचाऱ्यांना आगारप्रमुख अजय वनारसे यांनी हजर करून घेतले. ज्या ९० कर्मचाऱ्यांना बडतर्फ करण्यात आले आहे, त्यांनी अपीलाचे अर्ज सादर केले, ते विभाग नियंत्रकांकडे पाठवण्यात आले. सेवासमाप्ती झालेल्या १४ जणांनीदेखील पुन्हा सेवेत घेण्यासाठी अर्ज दिले आहेत. त्यांनाही लवकरच सेवेत समाविष्ट करून घेण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येईल.

**न्यायालयाच्या आदेशानुसार आम्ही आज कामावर हजर होत आहोत. आम्ही या काय जिंकलो काय हरलो यापेक्षा या काळात सन्मानाने जगायला शिकलो, ही आमच्यासाठी मोठी बाब आहे.**
**-प्रसन्ना पाटील, कर्मचारी, अलिबाग एसटी आगार**

## कशेडी घाटात ट्रकच्या धडकेने दुचाकीस्वाराचा मृत्यू

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील कशेडी घाटामध्ये धामणदिवी गावाच्या हद्दीत मंगळवारी (दि. १९) सकाळी ट्रकने चुकीच्या बाजूने ओव्हरटेक करून समोरून येणाऱ्या दुचाकीला धडक दिली. या अपघातात दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला. अपघातानंतर ट्रक घटनास्थळी सोडून चालक पसार झाला आहे.

मुंबई-गोवा महामार्गावरील कशेडी घाटातील धामणदेवी गावाच्या हद्दीत मंगळवारी सकाळी पावणेसात वाजण्याच्या सुमारास तळोजा ते लोटे जाणाऱ्या ट्रक (एमएच-०४,डीके-७२५८) वरील चालकाने ओव्हरटेक करून विरुध्द बाजूला जाऊन समोरून मुंबइकडे येणाऱ्या दुचाकीला (एमएच-०८,एव्ही-३७२६) धडक दिली. या अपघातात दुचाकीस्वार अथर्व मोहन सावंत (वय २५, रा. पेढांबे, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी) यांचा जागीच मृत्यू झाला. अपघातानंतर ट्रकचालक ट्रक अपघातस्थळी सोडून पळून गेला असून अपघातस्थळी एकेरी वाहतूक सुरळीत सुरू करण्यात आली.


### विशेष सर्वसाधारण सभेची नोटीस

शिव सागर नागरी सहकारी पतसंस्था मर्या., कामोठे, ता. पनवेल, जि. रायगड (अवसायन) या सहकारी संस्थेची विशेष सर्वसाधारण सभा दि. २८/०४/२०२२ रोजी सकाळी ११:०० वाजता संस्थेच्या कार्यालयात आयोजित केली असून त्यांची सविस्तर सभा नोटीस सदर संस्थेच्या कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. तरी संबंधित संस्थेच्या सर्व सभासदांनी सभेस उपस्थित राहून कामकाजामध्ये भाग घ्यावा.

**सही/-**
**शाम कपोते**
**(अवसायक)**
**शिव सागर नागरी सहकारी**
**पतसंस्था मर्या., कामोठे, ता. पनवेल**

### पनवेल महानगरपालिका

जा.क्र.पमपा/सचिव/२१-२२/प्र.क्र.२६/९३/२२ दिनांक :- १८/०४/२०२२

**पनवेल महानगरपालिकेची विशेष सर्वसाधारण सभा**
**सूचना क्रमांक १५, दिनांक २२/०४/२०२२**

पनवेल महानगरपालिकेची विशेष सर्वसाधारण सभा शुक्रवार, दिनांक २२/०४/२०२२ रोजी सकाळी ११:०० वाजता पनवेल महापालिकेचे नाट्यगृह, आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके, पनवेल या ठिकाणी खालील विषयांवर विचारविनिमय करण्यासाठी बोलविण्यात आली आहे. तरी सदर बैठकीस उपस्थित राहावे.

**शुक्रवार, दिनांक २२/०४/२०२२ रोजी विशेष सर्वसाधारण सभेची**
**विषय पत्रिका**

**मा. आयुक्त महोदयांकडील कार्यालयीन कामकाज**

स्थायी समिती सभा ठराव क्र. ५४५ दिनांक १८/०४/२०२२ रोजी मंजूर झालेला पनवेल महानगरपालिकेचा आर्थिक वर्ष सन २०२१-२२ चे सुधारित व सन २०२२ - २३ चे मूळ वार्षिक अंदाजपत्रक मंजूर करणेबाबत निर्णय घेणे.

(मा. महापौर महोदया यांचे मंजुरीने व आदेशान्वये)

दिनांक :- १८/०४/२०२२

**सही/-**
**(तिलकराज खापर्डे)**
नगर सचिव (प्र.)
पनवेल महानगरपालिका, पनवेल

### नामांकित कंपनीसाठी खालील पदांसाठी महाराष्ट्रातील विविध प्रकल्पांच्या ठिकाणी काम करणेस इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागवित आहेत.

- फिटर : आय.टी.आय. डिप्लोमा, कमीत कमी ३ ते ५ वर्षे अनुभव
- इलेक्ट्रिशियन : आय.टी.आय. डिप्लोमा, कमीत कमी ३ ते ५ वर्षे अनुभव
- वेल्डर : आय.टी.आय. डिप्लोमा, कमीत कमी ३ ते ५ वर्षे अनुभव
- सिनिअर वेल्डर : आय.टी.आय. डिप्लोमा, कमीत कमी १० वर्षे अनुभव
- सिनिअर फिटर : आय.टी.आय. डिप्लोमा, कमीत कमी १० वर्षे अनुभव
- सिनिअर इलेक्ट्रिशियन : (पीएलसी ऑपरेटर) आय.टी.आय. डिप्लोमा, कमीत कमी १० वर्षे अनुभव
- एल.एम.व्ही. ड्रायव्हर : कमीत कमी १ वर्षे अनुभव (ड्रायव्हिंग लायसन्स आवश्यक)
- कम्प्युटर ऑपरेटर : पदवीधर कमीत कमी २ वर्षे अनुभव

इच्छुक उमेदवारांनी खालील पत्त्यावर/ईमेलने अर्ज पाठवावेत.

**मे. ठाकूर इन्फ्राप्रोजेक्टस् प्रा.लि.**
१ ला मजला, ओम सदनिका बिल्डींग, प्लॉट नं. २६५/१, पनवेल उरण रोड,
पनवेल-४१०२०६, जि. रायगड, फोन : ०२२-२७४५२७१३ / ९७६९४०९१२१
ईमेल आयडी : thakurinfraprojects@gmail.com
वेबसाईट : www.thakurinfraprojects.in


## वरदविनायकाच्या दर्शनासाठी महडमध्ये भक्तांचा महापूर

**आकर्षक रांगोळ्यांनी मंदिर सजले**



(छाया : विनायक माडे)

**खोपोली : प्रतिनिधी**

अंगारकी चतुर्थी निमित्त अष्टविनायकापैकी एक असलेल्या खालापूर तालुक्यातील महड येथील वरदविनायक गणपतीच्या दर्शनासाठी मंगळवारी (दि. १९) भक्तांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती, मंदिराच्या बाहेर लांबच लांब रांगेने भक्तांचा हा मळा फुलला होता.





अंगारकी चतुर्थी निमित्त मंदिरात काढण्यात आलेली श्री विठ्ठलाची आणि श्रीरामाची सुंदर रांगोळी सर्वांचे लक्ष वेधून घेत होती. रवी आचार्य (नेरळ), मंगेश देशमुख (मानकीवली), तुळशीराम ठोंबरे (टेंभरी), सचिन पाटील (कलोते), उत्तम जगदाळे (पनवेल), किशोर हातवे (बदलापूर), अतुल तट्टू (महड), साक्षी देशमुख, स्नेहल देशमुख, श्रेया देशमुख (मानकीवली), स्वरा पाटील, जीवन ठोंबरे, तन्मय पाटील (कलोते) इत्यादी कलाकारांनी ही मनमोहक रांगोळी दहा बाय तीस फूट आकारात आकारली. यात साबुदाणे, काळे तीळ व इतर कडधान्यांचे सुमारे १०० किलो साहित्य वापरले होते. ही रांगोळी काढण्यास सुमारे तीस तास लागल्याचे कलाकारांनी सांगितले.

मंदिराबाहेर मोठ्या प्रमाणात वाहनांची गर्दी होती. ट्रस्टतर्फे जागोजागी पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आली होती. गणपती संस्थान ट्रस्ट तर्फे अध्यक्ष मोहिनी वैद्य यांच्या मार्गदर्शनाखाली मंदिर व मंदिराबाहेर चोख सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली होती. भाविकांना त्रास होणार नाही, यासाठी व्यवस्थापक बडगुजर हे जातीने लक्ष ठेवून होते.

आयपीएलचा रनसंग्राम | आजचा सामना | दिल्ली वि. पंजाब सायं. ७.३० वा., मुंबई

# राजस्थानचा कोलकातावर रोमहर्षक विजय

## ■ चहलची हॅट्ट्रिक ठरली टर्निंग पॉइंट



**मुंबई : प्रतिनिधी**

**आयपीएलमध्ये सोमवारी झालेल्या रोमहर्षक सामन्यात राजस्थान रॉयल्सने कोलकातावर सात धावांनी विजय मिळविला. राजस्थानने २१७ धावांचा डोंगर उभारूनही कोलकाताने २१० धावा करून चांगली टक्कर दिली. जोस बटरलने १०३ धावांची शतकी खेळी आणि युजवेंद्र चहलने हॅट्ट्रिकसह टिपलेले एकूण पाच बळी राजस्थानच्या विजयात महत्त्वपूर्ण ठरले.**

राजस्थानने दिलेल्या २१८ धावांचे आव्हान गाठण्यासाठी फलंदाजीसाठी आलेल्या कोलकाताची सुरुवात खराब झाली. पहिल्या षटकाच्या पहिल्याच चेंडूमध्ये सुनील नरेन धावबाद झाला. त्यानंतर अरॉन फिंच आणि श्रेयस अय्यर या जोडीने मैदानावर जम बसवला. फिंचने अर्धशतकी खेळी करीत २८ चेंडूमध्ये नऊ चौकार आणि दोन षटकार लगावत ५८ धावा केल्या.

दुसऱ्या विकेटसाठी आलेल्या कोलकाताचा कर्णधार श्रेयस अय्यरनेही मोठी खेळी केली. त्याने अवघ्या ५१ चेंडूमध्ये अर्धशतकी खेळी करीत सात चौकार आणि चार षटकार लगावत ८५ धावा केल्या. १७व्या षटकात युजवेंद्र चहलने कोलकाताच्या फलंदाजांना पळता भुई थोडी केली. या षटकात चहलने एकापाठोपाठ तीन विकेट घेत हॅट्ट्रिक नोंदवली. चहलच्या या षटकात श्रेयस अय्यर (८५), शिवम मावी (०), पॅट कमिन्स (०) हे गडी एकापाठोपाठ बाद झाले. त्यानंतर सामना कोलकाताच्या हातातून गेल्याचे दिसत असताना शेवटच्या फळीतील उमेश यादवने सामन्याला कलाटणी दिली. त्याने १८व्या षटकात दोन षटकार आणि एक चौकार लगावत सामना फिरवला. १६ चेंडूमध्ये ३१ धावांची गरज असताना उमेशने धडाकेबाज फलंदाजी करीत १३ चेंडूमध्ये १८ धावा अशी स्थिती करून ठेवली. शेवटच्या सहा चेंडूमध्ये कोलकाताला ११ धावांची गरज होती. मात्र दुसऱ्याच चेंडूवर शेल्डन जॅक्सन झेलबाद झाला आणि त्यांची विजयाची आशा मावळली. कोलकाताने शेवटचा गडी बाद होईपर्यंत २१० धावा केल्या.

तत्पूर्वी कोलकाताने नाणेफेक जिंकून गोलंदाजीचा निर्णय घेतला होता. राजस्थानकडून जोस बटरलने ६१ चेंडूमध्ये नऊ चौकार आणि पाच षटकार लगावत तब्बल १०३ धावा केल्या. कर्णधार संजू सॅमसनने १९ चेंडूमध्ये ३८ धावा केल्या, तर शिमरॉन हेटमायर शेवटच्या षटकापर्यंत मैदानावर टिकून राहत नाबाद २६ धावा केल्या.

# बटलरकडे ऑरेंज कॅप कायम

**मुंबई : प्रतिनिधी**

यंदाच्या आयपीएल मोसमात राजस्थान रॉयल्सच्या जोस बटलरने सोमवारी कोलकाता नाईट रायडर्सविरुद्ध खेळल्या गेलेल्या साखळी सामन्यात हंगामातील दुसरे शतक झळकावले. बटलरचे राजस्थानसाठी हे तिसरे शतक असून या फ्रँचायझीसाठी तीन शतके झळकावणारा तो पहिला फलंदाज ठरला आहे. या खेळीच्या जोरावर बटलरने आता ऑरेंज कॅपच्या शर्यतीत आपले स्थान मजबूत केले आहे.

### पर्पल कॅप चहलकडे

पर्पल कॅपच्या शर्यतीत युझवेंद्र चहल कोलकाता नाइट रायडर्स विरुद्धच्या अप्रतिम कामगिरीनंतर सहा सामन्यांत १७ विकेट्स घेऊन आघाडीवर आहे. त्याच्यापाठोपाठ टी नटराजन (१२) दुसऱ्या, कुलदीप यादव (११) तिसऱ्या, आवेश खान (११) चौथ्या आणि वानिंदू हसरंगा (११) पाचव्या स्थानावर आहेत.

बटलरने दीर्घकाळ ऑरेंज कॅप कायम ठेवली आहे. त्याने सहा सामन्यांत ३७५ धावा केल्या असून या मोसमात सर्वाधिक धावा करणाऱ्या खेळाडूंच्या यादीत तो अव्वल आहे. त्याच वेळी कोलकाताचा कर्णधार श्रेयस अय्यर याने एकाच सामन्यात ८५ धावांची खेळी केली. सात सामन्यात २३६ धावा केल्याने तो ऑरेंज कॅपच्या शर्यतीत दुसऱ्या क्रमांकावर पोहचला आहे, तर लखनऊ सुपर जायंट्सचा कर्णधार केएल राहुल सहा सामन्यात २३५ धावांसह तिसऱ्या क्रमांकावर आहे.





# बुद्धिबळ स्पर्धेत भारताच्या गुकेशला अजिंक्यपद

**माद्रिद : वृत्तसंस्था**

भारताचा युवा ग्रँडमास्टर डी. गुकेशने स्पेन येथे झालेल्या ४८व्या ला रोडा आंतरराष्ट्रीय खुल्या बुद्धिबळ स्पर्धेचे अजिंक्यपद पटकावले. १५ वर्षीय गुकेशने नऊ फेऱ्यांमध्ये अपराजित राहताना एकूण आठ गुणांसह ही स्पर्धा जिंकली.


गुकेशला सात सामने जिंकण्यात यश आले, तर त्याचे दोन सामने बरोबरीत सुटले. त्याने अखेरच्या फेरीत इस्राइलच्या व्हिक्टर मिखालेव्स्कीवर मात करीत अग्रस्थान मिळवले. दुसऱ्या स्थानावरील अर्मेनियाच्या



हेक मार्तिरोस्यानच्या खात्यावर ७.५ गुण होते. गुकेशने या स्पर्धेत मिखालेव्स्कीसह अल्बेर्तो हर्नांडिझ रॅमोस, डॅनिएल रोमेरो पलारेस, हाविएर बेर्नाबेऊ लोपेझ कार्लोस, जॉर्ज रेन्टेरिया आणि नाहुल गवारेते यांना पराभूत केले.

गुकेशचा सहकारी ग्रँडमास्टर आर. प्रज्ञानंदला तिसऱ्या स्थानावर समाधान मानावे लागले. स्पर्धेअंती प्रज्ञानंदसह अन्य चार खेळाडूंचे सात गुण होते, मात्र टायब्रेकमधील सरस गुणांच्या बळावर प्रज्ञानंदला तिसरे स्थान मिळाले. सहाव्या फेरीत प्रज्ञानंद आणि गुकेश आमनेसामने आले होते. या सामन्यात प्रज्ञानंदला विजयाची संधी होती, पण गुकेशने दमदार पुनरागमन केल्यामुळे ४१ चालींअंती हा सामना बरोबरीत सुटला. प्रज्ञानंदने अखेरच्या फेरीत हेक मार्तिरोस्यानवर २६ चालींमध्ये विजय मिळवला. गुकेशप्रमाणेच प्रज्ञानंदही या स्पर्धेत अपराजित राहिला.

# दिल्ली–पंजाब सामना पुण्याऐवजी मुंबईत होणार



**मुंबई : प्रतिनिधी**

दिल्ली कॅपिटल्सच्या ताफ्यामध्ये कोरोना संसग झालेल्यांची संख्या पाच झाली आहे. त्यानंतर आता बुधवारी (दि. २०) पंजाब किंग्ज आणि दिल्ली यांच्यातील सामन्याचे ठिकाण बदलण्यात आले आहे. आता हा सामना पुण्यातील एमसीए स्टेडियमऐवजी मुंबईतील ब्रेबॉर्न स्टेडियमवर होणार आहे. बीसीसीआयने याबाबत अधिकृत माहिती दिली.

दिल्ली कॅपिटल्सचा खेळाडू मिचेल मार्शला कोरोनाची लागण झाल्याचे समोर आले होते. याशिवाय टीम फिजिओ पॅट्रिक फरहार्ट आणि टीम डॉक्टर अभिजित साळवी, स्पोर्ट्स मसाज थेरपिस्ट चेतन कुमार, सोशल मीडिया कंटेन्ट टीम सदस्य आकाश माने या सर्वांना कोरोनाची लागण झाली आहे. दिल्लीचा संघ सध्या मुंबईत असून सोमवारीच पुण्याला रवाना होणार होता, मात्र कोरोनाची प्रकरणे समोर आल्यानंतर खेळाडू आणि कर्मचाऱ्यांना हॉटेलमधील त्यांच्या खोलीत राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

### एफए चषक फुटबॉल स्पर्धा

# चेल्सीची अंतिम फेरीत धडक

**लंडन : वृत्तसंस्था**

रुबेन लॉफ्टस–चीक आणि मेसन माऊंट यांनी उत्तरार्धात केलेल्या गोलच्या जोरावर चेल्सीने क्रिस्टल पॅलेसला २–० असे पराभूत करीत एफए चषक फुटबॉल स्पर्धेच्या अंतिम फेरीत धडक मारली.

लंडनच्या वेम्बली स्टेडियवर झालेल्या उपांत्य फेरीतील सामन्याच्या पूर्वार्धात दोन्ही संघांना गोल करता आला नाही. उत्तरार्धात ६५व्या मिनिटाला लॉफ्टस–चीकने केलेल्या गोलमुळे १–० अशी आघाडी मिळाली. मग माऊंटने ७६व्या मिनिटाला गोल करत चेल्सीला २–० अशा मजबूत स्थितीत पोहचवले. त्यानंतर पॅलेसने सामन्यात पुनरागमन करण्याचा प्रयत्न केला, मात्र चेल्सीचा भक्कम बचाव भेदण्यात त्यांना अपयश आले. गोलरक्षक मेंडीनेही चांगला खेळ केला.

आता १४ मे रोजी होणाऱ्या अंतिम सामन्यात चेल्सीची लिव्हरपूलशी गाठ पडणार आहे. लिव्हरपूलने मँचेस्टर सिटीवर ३–२ असा निसटता विजय मिळवला होता.

# श्रेयसकडे सक्षम कर्णधाराचे सर्व गुण -शास्त्री

**मुंबई : प्रतिनिधी**



श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखाली कोलकाता नाइट रायडर्सने यंदा आयपीएलमध्ये केलेल्या कामगिरीने भारताचे माजी कर्णधार रवी शास्त्री प्रभावित झाले आहेत. श्रेयसकडे कर्णधारपद सक्षमपणे सांभाळण्यासाठी आवश्यक सर्व गुण असल्याचे सांगत त्याची शास्त्री यांनी तारीफ केली.

शास्त्री म्हणाले, श्रेयसची आक्रमक नेतृत्वशैली पाहिल्यावर यंदा पहिल्यांदाच कोलकाताच्या संघाचे कर्णधारपद भूषवत आहे असे वाटत नाही. तो गेल्या तीन–चार वर्षांपासून कोलकाताचा कर्णधार असल्याप्रमाणे वावरतो. त्याच्यावर कर्णधारपदाचे दडपण दिसत नाही. आयपीएलचे जेतेपद पटकाविण्यासाठी आपण आणि आपल्या संघाने कशा प्रकारचे क्रिकेट खेळले पाहिजे हे त्याला ठाऊक आहे तसेच आपण फलंदाज म्हणून योगदान देणे महत्त्वाचे असल्याचेही तो जाणतो. तो सामन्यापूर्वी आणि सामन्यानंतरही अगदी स्पष्टपणे बोलतो. त्याचा हा गुणही मला भावतो. कर्णधार म्हणून त्याचे भविष्य खूप उज्वल आहे.

कोलकाताने यंदाच्या हंगामापूर्वी झालेल्या खेळाडू लिलावात श्रेयसला १२.२५ कोटी रुपये देत आपल्या संघात समाविष्ट करून घेतले तसेच त्याच्यावर कर्णधारपदाची जबाबदारी सोपवली. त्याच्या नेतृत्वाखाली कोलकाताने सुरुवातीच्या सहापैकी तीन सामने जिंकले, तर तीन सामन्यांत त्यांना पराभव पत्करावा लागला आहे.




# त्सित्सिपास दुसऱ्यांदा विजेता

**मोनॅको : वृत्तसंस्था**

ग्रीसच्या स्टेफानोस त्सित्सिपासने सलग



दुसऱ्यांदा माँटे कार्लो मास्टर्स टेनिसचे जेतेपद मिळवले. त्याने अंतिम सामन्यात स्पेनच्या बिनमानांकित अलेहान्द्रो डेव्हिडोव्हिचला ६–३, ७–६ (३) असे सरळ सेटमध्ये पराभूत केले.

माँटे कार्लो स्पर्धा दोन वेळा जिंकणारा त्सित्सिपास हा राफेल नदालनंतरचा पहिलाच खेळाडू ठरला. अंतिम सामन्याचा पहिला सेट त्सित्सिपासने मोठ्या फरकाने जिंकला, तर दुसऱ्या सेटमध्ये डेव्हिडोव्हिचने त्याला चांगली झुंज दिली, मात्र त्सित्सिपासने टायब्रेकरमध्ये सेट जिंकत सामनाही जिंकला.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com